# बाल धोरण २०१४



मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.ना.श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे
मंत्री, महिला व बाल विकास



मा.ना.श्रीमती विद्या जयप्रकाश ठाकूर
राज्यमंत्री, महिला व बाल विकास




## महिला व बाल विकास विभाग

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास

WOMEN & CHILD DEVELOPMENT

# बाल धोरण २०१४

## विषयसूची


| अ.क्र. | विषय | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी | ४ ते ५ |
| २ | प्रस्तावना | ६ |
| ३ | दूरगामी भूमिका | ६ |
| ४ | अभियान | ६ |
| ५ | बालकाची व्याख्या | ६ |
| ६ | मार्गदर्शक तत्वे | ६ ते ७ |
| ७ | अग्रक्रम | ८ ते २१ |
| | ७.१ बाल संगोपन व विकास | ८ |
| | ७.२ जीवन आणि आरोग्य | ८ ते ९ |
| | ७.३ पोषण | ९ ते १० |
| | ७.४ प्रारंभिक प्रोत्साहन व शिक्षण - जन्मापासून ते ६ वर्षे | १० ते ११ |
| | ७.५ शिक्षण आणि विकास (६ वर्ष आणि त्यापुढील) | ११ |
| | ७.६ शिक्षण अधिकाराची शाश्वती | ११ ते १३ |
| | ७.७ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे बळकटीकरण | १३ |
| | ७.८ मनोरंजनासंबंधी उपाययोजना | १३ |
| | ७.९ संरक्षण | १३ ते १४ |
| | ७.१० सर्वसाधारण उपाय: | १४ ते १५ |
| | ७.११ विशिष्ट बालकांसंबंधी उपाय | १५ ते २० |
| | ७.१२ सहभागित्व | २० ते २१ |
| | ७.१३ मुलींविषयी विशेष आस्था व काळजी | २१ |
| ८ | भागीदारी, समन्वय आणि समर्थन | २२ ते २३ |
| | ८.१ भागीदारी | २२ |
| | ८.२ समन्वय | २२ |
| | ८.३ समर्थन | २३ |
| ९ | संशोधन, दस्तावेज आणि कार्यक्षमता | २३ |
| १० | संसाधन वाटप | २३ |
| ११ | राज्य बाल संसाधन केंद्र | २४ |
| १२ | बाल विकास निधी | २४ |
| १३ | बाल धोरणाची उद्दिष्टे | २४ |

# १. पार्श्वभूमी

भारतामध्ये बालकांसंबंधीत अनेक कायदे अस्तित्वात असले तरी त्यापैकी बरेच कायदे आंतरराष्ट्रीय बाल हक्क परिषदेच्या परिमाणाची पूर्तता करण्यास अपुरे पडत होते म्हणून १९७४ साली "राष्ट्रीय बाल धोरण" जाहीर करण्यात आले होते. त्याआधारावर महाराष्ट्रात बालकांचे हक्क अबाधीत राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २००२ साली, बाल विकास धोरण निश्चित केले. आंतरराष्ट्रीय बाल हक्क परिषदेने सुचविलेले बालकांचे हक्क व अधिकार आणि त्या अनुषंगाने करावयाच्या तरतुदी विचारात घेऊन महाराष्ट्राचे पहिले बाल विकास धोरण तयार करण्यात आले. बालकांच्या विकासासाठी, रचनाबद्ध, सर्वंकष व नियोजित विकास साधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न राहील अशी हया धोरणाची संकल्पना होती. वर्ष २००२ च्या धोरणात सुनिश्चित केले होते की जागतिकरणाच्या युगात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक गरजांचे स्वरुपही बदलत असते. या बदलाशी महाराष्ट्राचे धोरण सुसंगत राहण्याच्या दृष्टीने या धोरणांतर्गत घेतलेल्या निर्णयांचे पुनर्विलोकन करण्यात येईल. त्यानंतर बराच कालावधी लोटला असून बरेच बदलही घडले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात बालकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी नवीन बाल विकास धोरण निश्चित करणे ही काळाची गरज आहे. बालहक्कांवर भर देणारी अनेक कलमे भारतीय संविधानात समाविष्ट आहेत, त्यातील कलम ३९ (ई) व (एफ) मध्ये असे म्हटले आहे की, ''बालकांचा विकास सुयोग्य वातावरणात होऊ शकेल असे बाल हक्क विषयक धोरण राज्याद्वारे ठरविण्यात येईल. तसेच बालकांचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा असलेल्या वातावरणात त्यांचे बालपण आणि किशोरावस्था यांचे रक्षण आणि नैतिक अध:पतन व भौतिक प्रभाव यातून उद्‌भवणाऱ्या शोषणापासून राज्य संरक्षण करील." त्याप्रमाणे बालकांसाठी २००३ साली जी राष्ट्रीय सनद प्रसारित करण्यात आली होती, यामध्ये "एकही बालक उपाशी, अशिक्षित किंवा आजारी राहणार नाही," या बालकांविषयीच्या राष्ट्रीय दायित्वाचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. बालकांच्या काळजी व संरक्षण तसेच विकासाकरीता प्रत्येक नियम, अधिनियम कायदा – जसे की बालन्याय (काळजी व संरक्षण) कायदा, (२०००, २००६ व २०११ मध्ये सुधारणा), मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा (२००९), बालविवाह प्रतिबंधक कायदा (२००६), बालकामगार प्रतिबंधक कायदा (१९८६), अनैतिक वाहतुक प्रतिबंधक कायदा (१९५६) व सुधारित (१९८६), हिंदू दत्तक व पोटगी कायदा (१९५६), पालक व पाल्य अधिनियम (१८९०), केन्द्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाची मार्गदर्शक तत्वे (२०११) आणि लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा (२०१२) आणि विविध संस्था, व विभाग जसे महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, एकात्मिक बाल विकास योजना, एकात्मिक बाल संरक्षण योजना यांसारख्या योजना विकसित झाल्या आहेत.

२. एकही बालक विकासाच्या व संरक्षणाच्या प्रक्रियेतून वंचित राहू नये, याची खात्री या धोरणाद्वारे केली जाईल. सहस्त्रक विकास उद्दिष्टांनुसार बालकांच्या व किशोरांच्या सुदृढ आणि यशस्वी विकासासाठी तसेच त्यांच्या आरोग्य, शिक्षण, पोषण व विकास व संरक्षण यांसाठी, खात्री देण्यात आली आहे. आरंभीच्या बालपणातील संगोपन आणि शिक्षण यांवरील राष्ट्रीय धोरण केन्द्रशासनाच्या महिला व बाल विकास विभागाने तयार केले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने बालक हक्कविषयक अधिवेशन घेतले व सनद तयार केली. त्या सनदेवर

भारताने ११ डिसेंबर १९९२ रोजी शिक्कामोर्तब केले. संयुक्त राष्ट्रसंघाने २४ फेब्रुवारी २०१० रोजी बालकांच्या पर्यायी संगोपनासाठी जी मार्गदर्शक तत्वे स्वीकारली आहेत, त्यानुसार जी बालके पालकांच्या संगोपनापासून वंचित आहेत किंवा तशी स्थिती निर्माण होण्याचा धोका बालकांना आहे, अशा बालकांची सुरक्षितता व स्वास्थ्य जपणे, त्यांना संस्थांतर्गत संरक्षण देणे, पालकांकडे सोपविणे आणि जर हे शक्य नसले तर अन्य सुयोग्य व कायमस्वरुपी उपाय शोधणे असा आहे.

३. महाराष्ट्र राज्य, भारतीय संविधान आणि आंतरराष्ट्रीय कायदे व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील करारांचे पालन करण्यास कटिबद्ध आहे. बालकांना हक्कांवर आधारित अशा चौकटीत उत्कृष्ट दर्जाचे संगोपन संरक्षण, विकास व त्यांच्या सक्षमीकरणाची हमी महाराष्ट्र राज्य देते. महाराष्ट्र राज्य बालकांच्या विकास कार्यक्रमासंदर्भात पुरोगामी दृष्टीकोनासाठी सर्वपरिचित आहे. तरीसुध्दा अजूनही अनेक संवेदनशील व दुर्बल कुटुंबे अशी आहेत, की जेथील बालकांना विकासासाठी समान संधी मिळण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भानुरूप हे चित्रही बदलत आहे. उदा. वाढत्या शहरी लोकसंख्येमुळे घरे व आश्रयस्थाने, मुलभूत सोयीसुविधा या सर्वांचा अभाव व असंघटित कामगारांमध्ये मोठी वाढ यासारखे विषय प्रामुख्याने पुढे आलेले आहेत. जरी राज्याच्या एकूण आर्थिक प्रगतीमध्ये वाढ होत असली तरी मानवी विकास निर्देशांकामध्ये जिल्हा पातळीवर असणारी विषमता हा काळजीचा विषय आहे. बालकामगारांचे प्रश्न, मोठया प्रमाणावर असणारी स्थलांतरितांची लोकसंख्या, सहा वर्षाखालील मुलांमध्ये कुपोषण, कमी होणारे लिंग गुणोत्तर, महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यांमध्ये आणि देशामध्ये वाढत जाणारे अवैध व अनैतिक मानवी व्यापाराचे प्रमाण, बालकांना पळवून नेणे याबरोबरच बालकांविरुध्दच्या गुन्हयांमध्ये धक्कादायक प्रमाणात वाढ, लैंगिक शोषण, बाल भिक्षेकरी आणि अनाथाची उपेक्षा व पिळवणूक यांसारखे विषय राज्य आणि सर्वांसाठीच अतिशय चिंतेचे आहेत. बाल न्याय यंत्रणाविषयक बहुतांश पूरक घटक कार्यरत असतानासुध्दा बाल न्याय विषयक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी, सर्व यंत्रणा बळकट करणे गरजेचे आहे. संबंधित विभागांच्या कार्यवाहीचा बालकांच्या जीवनावर परिणाम होणार आहे म्हणून बालक धोरण राज्यातील विविध विभागांना कार्यप्रवण करणारे असून, बालक धोरण बालकांसंबंधीची विद्यमान धोरणे, कायदे, कृतिआराखडा आणि कार्यक्रमांची माहिती देईल व त्यासंदर्भात मार्गदर्शन करेल.

४. राज्यातील सर्व बालकांच्या तसेच विशेषत: जे वंचित, मागास व दुर्बल घटकाखालील आहेत या वर्गासाठी न्याय, भेदभावरहित, समता, प्रतिष्ठा, संरक्षण, संगोपन, स्वातंत्र्याच्या अधिकारासाठी प्रभावी व परिणामकारक उपाययोजना करण्याकरीता तसेच त्यांना सुरक्षित ठेवण्यास कटिबद्ध आहे. कोणत्याही प्रथा, परंपरा, सांस्कृतिक व धार्मिक आचार, व्यवहारांस, बालकांच्या हक्कांवर मर्यादा व प्रतिबंध घालण्यास परवानगी दिली जाणार नाही अशी खात्री व हमी राज्य शासन याद्वारे देत आहे, हया सर्व बाबींवर खात्री देण्याची बांधिलकी राज्याची राहील म्हणून राज्य बाल धोरण २०१४ करिताचा निर्णय महाराष्ट्र राज्य याद्वारे अंगीकृत करीत आहे.

# २. प्रस्तावना

**२.१ गृहित धरण्यात येते की,**

अ. बाल्यावस्था जीवनाचे अविभाज्य भाग आहे व याचे आपले स्वत:चे अस्तित्व आहे.

ब. बालक म्हणजे १८ वर्षे वयोगटाचे खालील कोणतीही व्यक्ती

क. बालकांचे विविध समुह असल्यामूळे त्यांची आवश्यकता वेगवेगळी आहे. त्याप्रमाणे विशेष परिस्थितीत असणाऱ्या बालकांची आवश्यकता यापेक्षा वेगळी आहे.

ड. बालकांचे संरक्षणासाठी व एकात्मिक विकासासाठी दूरगामी, सतत, समयोचित, बहुआयामी अशी उपाययोजना आवश्यक आहे.

**२.२ हमी देण्यात येते की,**

अ. प्रत्येक बालक राज्याकरीता अनन्यसाधारण व अतिमहत्वाचा घटक राहील.

ब. सामाजिक परिस्थितीमुळे बालकांवर होणारे अन्याय, भेदभाव व असमानता दूर करण्याकरीता सुधारात्मक उपाययोजना व सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

क. कुटुंब किंवा कौटुंबिक वातावरणात संगोपन, विकास व वाढीची संधी, तसेच संरक्षण, प्रेम व काळजी घेण्याच्या संधीचे हक्क व सहभाग प्रत्येक बालकाला देण्याकरीता महाराष्ट्र राज्य बांधील राहील.

ड. बालकाच्या काळजी व त्यांचे पालनपोषणासाठी सामाजिक सुरक्षा व सुविधा यांचे पाठबळ कुटुंबाला दिले जाईल.

च. चांगले शिक्षण, सकारात्मक दृष्टिकोण, आदर्श, कौशल्ये आणि सामाजिक मूल्यांची बांधीलकीची, जाणीव असणारा बालक वर्गच पुढे सामाजिक मूल्यांप्रती प्रामाणिकता जपणारा प्रौढ व्यक्ती बनू शकेल, जो आपल्या समुदायाच्या आर्थिक आणि सामाजिक विकास व सांस्कृतिक संरक्षणाकरिता विधायक योगदान द्यायला तयार राहील म्हणून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व बालकांचे असणारे योगदान आणि त्या अनुषंगाने असणारे बालकांच्या संरक्षणासाठीचे व सर्वांसाठी समान संधीची हमी देण्याकरीता महाराष्ट्र राज्य बांधील राहील.

छ. प्रत्येक कायदा, नियम, अधिनियम, योजना, कार्यक्रम याची सर्वांना माहिती तसेच मार्गदर्शन हे धोरण करेल.

ज. स्थानिक, जिल्हा, विभागीय व राज्य स्तरावर जी काही कार्यवाही केली जाईल किंवा कार्यवाही करण्यात पुढाकार घेतला जाईल, ही सर्व कार्यवाही व पुढाकार या धोरणात नमूद तरतूदींच्या आधारे केली जाईल.

# ३. दूरगामी भूमिका

राज्यामध्ये प्रत्येक बालकाला आपली क्षमता प्रभावीपणे विकसित करण्यासाठी सुरक्षित वातावरण आणि समान संधी सुनिश्चित करणे.

# ४. अभियान

बालकांचे आरोग्य, पोषण, स्वच्छता, मूल्य व गुणवत्तायुक्त शिक्षण व प्रशिक्षण, मनोरंजन व क्रीडा यासाठी गुणवत्तापूर्ण सोयी सुविधा उपलब्ध करणे तसेच गैरवर्तणूक, छळ आणि दुर्लक्ष यांविरुध्द संरक्षण व त्यांच्या आयुष्याच्या विकाससंबंधी बाबी वर निर्णय घेताना त्यांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे कार्य राज्याद्वारे करण्यात येईल.

# ५. बालकाची व्याख्या

जागतिक संगठनेने आयोजित केलेले अधिवेशन (convention) द्वारे निश्चित केलेल्या धोरणान्वये अठरा वर्षे वयोगटापर्यन्त सर्व व्यक्ती बालक म्हणून ओळखले जातील, यात राज्याचे सर्व रहिवासी, प्रवासी व स्थलांतरित बालकांचा समावेश राहिल.

# ६. मार्गदर्शक तत्वे

६.१ बालहक्क हे जागतिक, अहस्तांतरित,

परस्परसंबंधित, परस्परावलंबित आणि अविभाज्य आहेत व त्यांचा सन्मान राखणे राज्याचे कर्तव्य राहील.

६.२ बालकांच्या हक्कांच्या बाबींवर विचार करताना सर्व बाल हक्कांबाबत समान संधीची खात्री देणे राज्याचे कर्तव्य राहील.

६.३ बालकांशी संबंधित कोणतेही काम एखाद्या व्यक्तीने, अधिकाऱ्याने किंवा संस्थेने हाती घेतले तरी समानता, न्याय आणि भेदभावरहीत तत्वांच्या आधारे ती कामे करण्यात येतील.

६.४ वय, लिंग, वंश, जात, भाषा, धर्म, मानसिक व शारिरीक आजार किंवा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती अशा कोणत्याही गोष्टींच्या आधारे बालकांमध्ये केला जाणारा भेदभाव सहन केला जाणार नाही.

६.५ सर्व बालकांची सुरक्षितता ही सर्वात महत्वाची आहे आणि त्यांना कोणतीही इजा, गैरवर्तणूक, दुर्लक्ष आणि पिळवणूक यांपासून त्यांचे संरक्षण करणे राज्याचे कर्तव्य राहील.

६.६ बालकांना त्यांचे अधिकार मिळावेत यासाठी राज्य शासन पुढाकार घेऊन उपाययोजना करेल व त्याकरताना वंचित, पीडित, शोषित, दुर्बल वर्गातील बालकांसाठी विशेष उपाययोजना करेल. सर्व बालकांना समान संधी उपलब्ध होताना कोणतीही रुढी, परंपरा, सांस्कृतिक अथवा धार्मिक प्रथा बालकांच्या हक्कांच्या आड येणार नाहीत किंवा त्यात अडथळे निर्माण करणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येईल.

६.७ बालकांचा सर्वांगीण विकास व बाल हक्क संरक्षणाची विशेष जबाबदारी विभागापुरता मर्यादित न ठेवता, शासकीय, निमशासकीय व स्वयंसेवी संस्था या सर्वांना जबाबदारी देणे.

६.८ बालकांच्या सर्वाधिक हिताचा विचार करूनच त्यांच्या विषयीचे सर्व उपक्रम आणि योजना यांचा आराखडा आखण्यासाठी राज्य शासन प्राधान्य देईल.

६.९ बालकांशी निगडित ज्या गोष्टींचा बालकांवर परिणाम होतो, अशा सर्वांबाबत बालकांशी त्यांच्या सुयोग्य वयोपरत्वे सल्लामसलत करणे, त्यांना त्यात सहभागी करुन घेणे, हा त्यांचा अबाधित हक्क आहे म्हणून या प्रक्रियेत बालकांची संमती घेणे आवश्यक राहील.

६.१० बालक कुटुंबाचा भाग असल्यामुळे समग्रतेने कुटुंबाच्या गरजांचे संरक्षण करणे आणि कौटुंबिक वातावरण प्रोत्साहित करणे, याकरिता कार्यक्रम व योजना विकसित करण्याची जबाबदारी शासन घेईल.

६.११ बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता कौटुंबिक वातावरण हे सर्वाधिक उपयुक्त आहे आणि संस्थात्मक सुविधा हा शेवटचा पर्याय असून आवश्यक त्या कालावधीकरिता असायला हवा.

६.१२ ज्या बालकांना संरक्षण हवे आहे, त्यांच्यासंबंधी असणाऱ्या माहितीची गुप्तता राखणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

६.१३ बालकांसंबंधीच्या सर्व उपक्रमांची, त्यांना सामावून घेणाऱ्या कार्यक्रमांची आखणी करताना व्यक्तिमत्वाची जाणीव, गटांची योग्यता, कौशल्य विकास आणि विशेष गरजा, (ज्या मुलांच्या शारीरिक–मानसिकतेवर आघात होऊ शकतो) असे घटक ओळखून त्याआधारे त्यांची दिशा ठरविण्यात येईल.

६.१४ बालकांशी संबंधित सर्व विभाग बालकांना एकत्रित सोयीसुविधा पुरविण्यासाठी समन्वयात्मक भूमिका घेतील याची खात्री शासन देईल.

६.१५ सर्व बालहक्कांच्या प्रसार आणि संरक्षणाकरिता स्पष्ट उपाययोजना राबविणे, ही राज्याची प्राथमिक जबाबदारी असेल. त्याची परिपूर्ती करण्यासाठी अशासकीय असलेल्या सर्व संस्था, संघटनांचे सहकार्य शासन घेईल.

६.१६ मुलांमधील व्यंग, विषमता इत्यादी विषयक एक दुसऱ्यास दूषण देणाऱ्या सवयी संदर्भात एकमेकांचा आदर करणे विषयी जाणीवजागृती व भावसाक्षरता निर्माण करणे.

# ७ अग्रक्रम

**जीवन, आरोग्य, संगोपन, पोषण, विकास, शिक्षण, संरक्षण, स्वच्छ पर्यावरण, मनोरंजन, भयमुक्त वातावरण, पुनर्वसन आणि सहभाग हे निर्विवादपणे प्रत्येक बालकाचे अधिकार आहेत आणि या धोरणाचे मुख्य प्राधान्य सूत्र आहे.**

## ७.१ बाल संगोपन व विकास

बालकांच्या सर्वांगीण पोषण व विकासासाठी जन्मापासून ते अठरा वर्षे वयापर्यन्त समान सुविधांची खात्री याबद्दल राज्याने जबाबदारी स्वीकारलेली आहे, त्याचे टप्पे असे राहील: जन्मापासून ते तीन वर्षांपर्यंत, तीन वर्षांपासून ते सहा वर्षांपर्यंत, सहा वर्षांपासून ते दहा वर्षांपर्यंत, दहा वर्षांपासून ते पंधरा वर्षांपर्यंत व पंधरा वर्षांपासून ते अठरा वर्षांपर्यंत. स्पष्ट वेगळया स्वरुपात दिसणाऱ्या या अवस्था (जन्मापासून ते अठरा वर्षांपर्यंत) बालकांच्या विकासासाठी आणि गरजांसाठी निरंतरपणे चालू असतात, प्रत्येक अवस्था ही पुढे येणाऱ्या अवस्थेचा पाया उभारत असते, म्हणूनच एकसंध बालक धोरणात सातत्याने काळजी, आरोग्य, पोषण, शिक्षण, संगोपन आणि संरक्षण यांसारख्या सर्वंकष माहितीची आवश्यकता आहे. तसेच मुलींचे आरोग्य व पोषणविषयक गरजा आणि त्यांचे एकूण जीवन यांच्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

## ७.२ जीवन आणि आरोग्य

सर्व बालकांना सर्वंकष आणि आवश्यक उच्चदर्जाच्या प्रतिबंधात्मक व रोगनिवारक अशा दोन्ही पातळीवरील आरोग्यसुविधा जन्माआधी आणि नंतर तसेच त्यांच्या वाढीच्या आणि विकासाच्या कालावधीत मिळवून देणे यांकरिता राज्य शासन बांधील आहे.

### राज्य शासन यासाठी पुढील सर्व आवश्यक उपाय योजेल

(१) राज्यातील सर्व बालकांना, ज्यामध्ये विशेष लक्ष; अनाथ, उपेक्षित, पिडीत समाज व बेघर लोकांची रस्त्यांवरील बालके, सार्वजनिक स्थानावर राहणारी



दुष्काळग्रस्त भागातील बालके, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची बालके, प्रकल्पग्रस्तांची बालके, कैदी व वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची बालके, दगडखाणी व विटभट्टीवरील काम करणाऱ्या कामगारांची बालके, अनुसूचित जातीजमातिची बालके, अल्पसंख्यांक समाजाची बालके, आदिवासी आणि दुर्गम भागात राहणारी बालके तसेच सर्व भागातील स्थलांतरित कामगारांचा, ऊसतोडीचे कामगार, बांधकाम कामगार, अविवाहीत महिलेची बालके तसेच अशी मुले ज्यांच्याकडे जन्माच्या दाखल्याचा पुरावा, यांसारखी कागदपत्रे नसेल अशा सर्वांना 'एकात्मिक बालविकास योजने'चा मार्ग उपलब्ध करणे.

(२) प्राथमिक आरोग्याची काळजी ज्यामध्ये जन्मापूर्वीची व जन्मानंतरची काळजी, सुरक्षित बाळंतपण, तान्हे मूल आणि मोठया होणाऱ्या मुलांना भरविण्याच्या पध्दती, किशोरवयीन मुली आणि तरुण मातांकडे बघण्याचा दृष्टिकोन, लसीकरण, किशोरवयीन मुली आणि इतर संवेदनशील गट यांना विशेष सहाय्य आणि आरोग्य, काळजी आणि पोषण, दुर्गम भागात दिल्या जाणाऱ्या पोषणविषयक शिक्षणाचा अंतर्भाव यांकरिता अत्यावश्यक उपाययोजनांची उपलब्धता आणि गुणात्मकता वाढविण्याकरीता विशेष उपाययोजना करणे.

(३) नवजात आणि बालपणीच्या आजारपणांचे –("उदा. अतिसार, तीव्र श्वासोच्छ्वास संसर्ग, रक्तक्षय") यातील उपचार मुलांना देण्याच्या व्यवस्थापनात सहज, सुलभ व समरुप व्यवस्था उपलब्ध करणे.

(४) सर्व प्रकारच्या पाणीवाहक, जंतूवाहक, संसर्गजन्य आणि इतर बालवयातील रोगराईपासून बालकांचे संरक्षण करणे.

(५) वैयक्तिक स्वच्छता आणि सुधारित सफाईयंत्रणेची

उपलब्धता सुनिश्चित करणे.

(६) सर्वांसाठी शुध्द व अविरत, पिण्याच्या पाण्याच्या सोयी निश्चित करणे.

(७) असंघटित क्षेत्रांतील (घरकाम करणाऱ्या स्त्रिया, स्थलांतरित महिला मुख्यत्वे बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या स्त्रिया यांचा समावेश आहे) गरोदर व स्तनदा महिलांना त्याविषयीच्या सेवासुविधा पुरविणे.

(८) बालकांतील रोगांचे आणि बालमृत्यूचे प्रमाण टाळण्यासाठी, आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणे.

(९) सर्व बालकांच्या जन्माच्या नोंदणीची सक्ती व निश्चिती करणे.

(१०) महिला व बाल विकास विभाग व आरोग्य खाते यांनी वेळेवर आणि वयानुरुप शंभर टक्के लसीकरण करणे.

(११) अल्पवयीन बालकांमधील व्यंग अथवा शारीरिक दुर्बलतेला प्रतिबंध करणे व व्यंग व शारीरिक दुर्बलता कमी करण्यासाठी या बालकांसाठी आवश्यक असणाऱ्या आरोग्यसुविधा पुरविणे, व्यंगांचा लवकर शोध लागेल व त्याची क्षती किमान होईल यासाठी सातत्यपूर्ण वैद्यकीय व सामाजिक सेवा आणि विशेष उपचार पुरविणे.

(१२) कर्करोग, एचआयव्ही एड्स, सिकलसेल व तत्सम रोगांनी ग्रस्त असलेल्या बालकांना वेदनाशामक वैद्यकीय उपचार आणि अखेरपर्यंतची सेवा शुश्रुषा देणे.

(१३) जन्म आणि मुलांमधील अंतर याबाबत पालक व तरुणांना माहितीचे सर्व स्त्रोत उपलब्ध करुन देणे.

(१४) प्रत्येक बालकाचा जन्म इस्पितळात किंवा यासारख्या स्थापित केलेल्या संस्थांमध्ये करण्यात येईल हे सुनिश्चित करणे.

(१५) प्रत्येक कुटुंबाला स्वच्छता व आरोग्य याचे नित्यक्रमतेबद्दल प्रोत्साहित करणे.

(१६) प्रत्येक ग्रामीण व नागरी भागतील बाल सुलभ शौचालय व बालकांकरीता खेळण्याची जागा उपलब्ध करुन देणे.

(१७) आदिवासी क्षेत्रात साधारणत: जन्मापासून ते ६ वर्ष वयाच्या बालकांमध्ये मुलींना आणि गर्भवती, स्तनदा मातांमध्ये मोठया प्रमाणात आढळणाऱ्या रक्तक्षयाच्या प्रतिबंधासाठी जनजागृती कार्यक्रम, आरोग्य, प्रशिक्षण तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी समन्वयाने पोषण कार्यक्रम राबविणे.

(१८) राज्यात SAM/MAM/LBL/LBW श्रेणीतील बालके जन्म घेण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य उपाय योजना करील.

## ७.३ पोषण

### राज्य शासन यासाठी पुढील सर्व उपाय योजेल-

१. गरोदर स्त्रिया, नवजात मुले, आणि किशोरवयीन बालक ज्यात विशेष भर संवेदनशील, विशेष गरजा असलेली बालके, आपदग्रस्त, दुष्काळग्रस्त, दुर्गम भागातील व वस्तीपातळीवरील बालके अशांवर राहील. त्यांच्यासाठी पोषण व्यवस्थापनेच्या पद्धतीचे (सर्वेक्षण करणे, आराखडा आखणे आणि देखरेख करणे) बळकटीकरण करण्यात येईल.

२. एकात्मिक बालविकास योजनेमध्ये सेवाभावी आणि प्रशिक्षित अंगणवाडी सेविकांच्या सहभागाबध्दल खात्री करणे आणि या योजनेतील पोषण घटकांच्या



प्रभावी अंमलबजावणी व देखरेखीकरिता विविध वर्गातील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

३. कुपोषणाचा धोका ओळखून तो कमी करण्यासाठी उपचार व पाठपुरावा करणे. यादृष्टीने संबंधित घटक व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकसित करण्याचा कार्यक्रम निश्चित करणे.

४. आईचे दूध पाजणे, बाळंतपणानंतर लगेच येणारे चिकाचे दूध पाजणे, योग्य वेळी पूरक पोषण आहार सुरु करणे, याबाबत योग्य पध्दतींना प्रोत्साहन देणे तसेच याबाबतचा अयोग्य दृष्टिकोन, अपुरे ज्ञान आणि सवयी बदलण्यासाठी प्रयत्न करणे.

५. बालकांच्या मलमूत्राची व्यवस्था निश्चित जागेवर व सुरक्षितपणे लावण्याची सवय निश्चित करणे.

६. आरोग्यवर्धक सवयींना प्रोत्साहन देणे. तसेच हात धुऊन जेवणाची व स्वच्छतेची सवय निश्चित करणे.

७. "सुदृढ बालक दिवस" साजरा करणे.

८. काम करणाऱ्या महिलांना व गरजूंना पाळणाघरे उपलब्ध करण्याची निश्चिती करणे.

९. बालकांच्या आरोग्य–पोषण सुरक्षिततेच्या दृष्टीने मध्यान्ह भोजन योजनेची व्याख्या ठरविणे व त्यानुसार कार्यवाही करणे.

१०. साधारणत: ० ते ६ वर्षीय बालकांमध्ये, किशोरवयीन मुलींमध्ये आणि गर्भवती व स्तनदा मातांमध्ये बहुधा आढळणाऱ्या रक्तक्षयाच्या प्रतिबंधासाठी आणि व्यवस्थापनासाठी विविध खात्यांमधील समन्वयाची काळजी घेणे.

११. सूक्ष्म पौष्टिक अन्नघटक जसे की 'अ' जीवनसत्व, लोह, फॉलिक ॲसिड, आयोडिन इ. यांच्या कमतरतेमुळे होऊ शकणाऱ्या रोगांना प्रतिबंध घालण्यासाठी पूरक पोषण आहाराचा पुरवठा करणे व यासंबंधी अस्तित्वात असणाऱ्या योजनेचे बळकटीकरण करणे

१२. किशोरीशक्ती योजनेचे बळकटीकरण करणे.

१३. काम करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठीची 'राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना' याचे मूल्यमापन आणि पुनर्रचना करणे.

१४. कारखाना कायद्याखाली येणारी सर्व क्षेत्रे आणि संबंधित कारखान्यांच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांसमवेत त्यांची ६ वर्षांपर्यंतची मुले असल्यास तेथे पाळणाघरे, संगोपन केंद्रे असल्याची निश्चिती करणे व प्रशिक्षित कर्मचारी नेमणे.

## ७.४ प्रारंभिक प्रोत्साहन व शिक्षण– जन्मापासून ते ६ वर्षे

**अगदी आरंभी होणारा मानवी विकास आणि विशेषत: मेंदूचा विकास, याचे महत्व लक्षात घेऊन मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम, २००९ च्या कलम ११ च्या आधारे राज्य सरकार पुढील उपाय योजेल -**

१. जन्मापासून ते तीन वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वंकष काळजीच्या दृष्टीने व त्यांना मानसिक – सामाजिक प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने बालकाच्या सर्वंकष काळजीसाठी घरगुती स्तरावर काळजीवाहक व्यक्तींना तत्सम शिक्षणाच्या संधी देणे.

२. राष्ट्रीय पाळणाघर योजनेचे मूल्यमापन आणि पुनर्रचना करणे आणि त्याद्वारे पुरेशा पायाभूत सुविधा, प्रशिक्षित काळजीवाहक व खेळण्याची सुयोग्य साहित्य याद्वारे पाळणाघर सुविधांचे महत्व वाढविणे.

३. सहा वर्षांखालील सर्व बालकांना आरंभीच्या बालपणातील शिक्षणाच्या सर्वंकष सोयीसुविधा पुरविणे.

४. तीन ते सहा वर्षीय बालकांसाठी असणाऱ्या एकात्मिक बालविकास योजनेखालील मनोरंजन, खेळाच्या माध्यमातून लहान मुलांचे शिक्षण योग्य व प्रशिक्षित आंगणवाडी सेविकांमार्फत देणे तसेच या शिक्षणाद्वारे शारीरिक, ज्ञानवाहक यंत्रणा, माहिती, भाषा, सामाजिक, भावनिक आणि कल्पकता यांच्या विकासाला योग्य संधी मिळेल या करीता एकात्मिक बाल विकास योजनेखालील शैशवकालीन काळजी

व शिक्षण या घटकांचे सक्षमीकरण करणे.

५. खेळावर आधारित शैशवकालीन शिक्षण, ज्याकरिता शिक्षक–विद्यार्थी यांचे प्रमाण प्रशिक्षित मदतनीस यांच्यासह योग्य प्रमाणात असावे हे सुनिश्चित करणे तसेच यासाठीच्या आवश्यक पायाभूत सुविधा, खेळणी आणि आरंभीचे शैक्षणिक साहित्य पुरविणे.

६. प्रत्येक ठिकाणी बाल मार्गदर्शन व समुपदेशन केन्द्र (शाळा, पोलीस स्टेशन, ग्राम पंचायत, पंचायत समिती इ.) सुरू करणे.

७. 'एकात्मिक बालविकास योजना' अंतर्गत 'शैशवकालीन काळजी व शिक्षण' यांच्या प्रभावी अंमलबजावणी व देखरेखीसाठी अंगणवाडी सेविकांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, तसेच विविध स्तरावरील अधिकाऱ्यांच्या दायित्वाची कक्षा वाढविणे.

८. खाजगी संस्थेकडून चालविणारे शैशवकालीन काळजी व शिक्षण केंद्रे आणि पाळणाघरे यांच्यासाठी नियामक मंडळाची स्थापना करणे.

९. एकात्मिक बालविकास उपक्रम – अंगणवाडी अंतर्गत शैशवकालीन शिक्षणासाठी गुणवत्ता मानके विकसित करणे व त्याबाबत खास मोहिम राबविणे.

## ७.५ शिक्षण आणि विकास (६ वर्षे आणि त्यापुढील)

१. प्रत्येक बालकाला, ज्ञान आणि शिक्षण याचा समान अधिकार आहे म्हणून प्रत्येक बालकासाठी हा अधिकार जपण्याची जबाबदारी राज्याची आहे. विशेष गरजा असेल त्यासाठीच्या संधी, पोषक वातावरण, प्रबोधन व त्याची सुविधा, माहिती, पायाभूत सुविधा, योजना आणि साहाय्य या सर्वांच्या आधारे बालकांच्या पूर्ण क्षमतांचा विकास होण्यासाठी राज्य कटिबध्द राहिल.

२. रियल्टी शो, सर्कस व या प्रकारच्या करमणूकीच्या खेळामधील बालकांच्या वापराबाबत धोरण निश्चित करणे.

३. विविध सण, उत्सव यामध्ये बालक गैरवापराबाबत प्रबोधन करणे.

४. पहिली ते बारावी च्या अभ्यासक्रमात आहार व आरोग्य विषयांच्या अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करुन समाविष्ट करावा. राज्यशासन कृती कार्यक्रम आखेल व नियोजन बध्द अभ्यासक्रमात समावेश करेल.

## ७.६ शिक्षणाधिकाराची शाश्वती.

१. सहा ते चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व बालकांना शिक्षणाची समान संधीची हमी देणे आणि भिक्षा मागणे व बालमजूरीला ती बळी पडू नयेत, यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा, २००९ च्या अंमलबजावणी व देखरेखीची खात्री करुन घेणे.

२. बालकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करण्याची संधी देत असताना औपचारिक शिक्षणामध्ये त्यांच्या सृजनशीलतेचे विकास करण्याकरीता खात्री करणे.

३. प्रत्येक वर्षीच्या शैक्षणिक सत्राच्या आरंभी बालकांच्या शाळेमधील प्रवेशाकरिता मोहीम राबविणे.

४. स्थलांतरित बालके, रस्त्यावरील रहिवासी, आदिवासी बालके इ. ज्यांचेपर्यंत पोहोचणे अवघड आहे, त्या मुलांना शिक्षणामध्ये समाविष्ट करणे.

५. ज्या भागांमध्ये विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांचे लहान खेडी, तांडा, वस्ती आहेत व तेथे अशा लहान खेडी, वाडा, वस्ती जेथे भटक्या जाती–विमुक्त जमाती, अनुसूचित जाती जमाती या वर्गाचे लोक राहतात व शिक्षणासाठी असलेल्या बालकांची योग्य संख्या असेल तर तेथे शाळा उघडणे व शिक्षणाची व्यवस्था करणे.

६. प्रत्येक वर्षी सर्व बालके शिकण्याच्या किमान पातळीपर्यन्त पोहोचतील याकडे विशेष काळजी घेणे.

७. संवेदनशील बालकांच्या वर्गावर जास्त भर देऊन मध्यान्ह भोजन योजना व तत्सम सुविधा प्रभावीपणे राबविणे.

८. राज्याने प्रायोजित केलेले व्यावसायिक आणि जीवन

कौशल्य प्रशिक्षणाची व्यवस्था सर्व बालकांना देणे.

९. स्थलांतरित, विधी संघर्षात अडकलेली, शारीरिक दुर्बलता असलेली बालके इ. संवेदनशील वर्गातील बालकांना कौशल्य विकास कार्यक्रमात सुलभतेने अंतर्भाव करण्यासाठी विशेष काळजी घेणे.

१०. बालकांमधील कला व कौशल्ये विकासाला गती मिळेल याकरीता व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा दर्जा उंचावण्याकरीता विशेष योजना आखणे.

११. शाळांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि मॅनेजमेण्ट इन्फॉर्मेशन सिस्टम यासाठीच्या सुविधा उत्तम व अद्ययावत असण्याची खात्री सुनिश्चित करणे.

१२. मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम, २००९ याच्या अंतर्गत भेदभावरहित वातावरणात धर्मनिरपेक्ष आणि चांगले शिक्षण याची खात्री करणे.

१३. मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम, २००९ च्या अंतर्गत सर्व स्तरातील बालकांना शासकीय, निमशासकीय, शिक्षण संस्था व शासनमान्यता प्राप्त शिक्षणसंस्थांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळेल, याची दक्षता घेणे.

१४. बालकांबरोबर होणाऱ्या गंभीर गैरवर्तणूकीमुळे होणारे भावनिक व मानसिक आघात, यासाठी समुपदेशनाच्या सेवा, तालुका व शालेय स्तरावर उपलब्ध करणे.

१५. लैंगिक गैरवर्तन, अवैध मानवी वाहतूक, बालविवाह इ. रोखण्यासाठी संबंधित नियम, अधिनियम, धोरणांची माहिती बालकांना, पालकांना व शिक्षकांना देणे.

१६. शाळेमध्ये शारीरिक शिक्षा व मानसिक शिक्षा रोखण्यासाठी सुयोग्य यंत्रणा तयार करणे.

१७. निकोटीन आणि इतर व्यसनीय पदार्थ कोणत्याही परिस्थितीमध्ये कुठल्याही ठिकाणी बालकांना वाटले, विकले व आणायला लावले जाणार नाही, याची खात्री करणे तसेच शाळेच्या परिसरात अमली व व्यसनीय सेवन निषेध विषयक जाणीवजागृतीचे फलक लावणे.

१८. सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना बालकांविषयक सर्व अधिनियम, नियम याची जाणीव करण्याकरीता प्रशिक्षण अनिवार्य करणे.

१९. सर्व बालकांच्या आणि विशेषत: विशेष गरजा असलेल्या बालकांकरिता अध्यापनशास्त्र आणि शिकण्यासाठीचे साहाय्यक यांच्या विकासासाठी संशोधन केंद्रे बळकट करणे.

२०. बालकांच्या शिक्षणाच्या मूल्यमापनाच्या गुणात्मक पातळ्या विकसित करणे तसेच बालके प्राथमिक शिक्षण पूर्ण करतील व आवश्यक ती शिक्षणाची पातळी प्राप्त करतील याची खात्री करणे.

२१. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व पिण्याचे पाणी तसेच साबण व अन्य आवश्यक सुविधांची व्यवस्था करणे.

२२. मुलींना मासिक पाळीच्या वेळेस स्वच्छता व आरोग्याच्या व्यवस्थापनासंबंधी वेळच्यावेळी जाणीवजागृती करण्याला प्रोत्साहन देणे व याकरीता विशेष मोहिम राबविणे.

२३. विशेष वर्गातील बालकांसाठी येणे—जाणे, वर—खाली उतरण्यासाठी सुकर सोय, दृकश्राव्य उपकरणे, पुस्तके आणि वाचनाचे साहित्य, ब्रेल इ. पायाभूत सुविधा असलेली शाळेची, संस्थेची संरचना उभारणे व अस्तित्वात असलेली शाळा, संस्था यांचे सक्षमीकरण करणे.

२४. शारिरीक, मानसिक व आर्थिक दुर्बलता असलेल्या सर्व बालकांच्या विशेष गरजा पुरविण्यासाठी प्रत्येक जिल्हयामध्ये विशेष प्रशिक्षकांचा एक गट तयार करणे.

२५. प्रत्येक बालकाची प्रगती, उपस्थिती यांची माहिती संकलित करण्यासाठी तसेच त्याची कुठे गळती किंवा स्थलांतर झाले आहे व त्यांना बालमजुरीपासून किंवा



भीक मागण्याच्या चक्रातून त्यांना दूर ठेवण्यासाठी सर्व शाळांमध्ये आणि राज्यामध्ये मध्यवर्ती मॅनेजमेण्ट इन्फॉर्मेशन सिस्टम यंत्रणेची तरतूद करणे.

२६. मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत होत असलेल्या कामाचा आढावा घेणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नवनव्या आव्हानांना अद्ययावत पध्दतीने सामोरे जाणे.

२७. विधि संघर्षग्रस्त बालकांकरीता शिक्षणाची सोय करणे.

२८. अनुसूचित जाती/जमाती या वर्गाबरोबरच अल्पसंख्याक प्रवर्गातील लोक ज्या ठिकाणी राहतात व शिक्षणासाठी असलेल्या बालकांची योग्य संख्या असेल तर तेथे शाळा उघडणे व शिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.

## ७.७ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बळकटीकरणाची उपाययोजना

१. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय विस्तारण्यासाठी खेडेगावामध्ये अधिकाधिक शाळा सुरु करणे. व अशा शाळांना शासनाकडून मान्यता देणे.

२. मुख्यत: खेडेगावामध्ये जेथे शालेय सुविधा उपलब्ध नसते, तेथे मुलांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची खात्रीशीर सोय करणे तसेच बस वाहतूक, शाळेपर्यंतचा योग्य रस्ता इत्यादिबाबत उपलब्धतेची हमी देणे.

## ७.८ मनोरंजनासंबंधी उपाययोजना

१. खेळ, क्रिडा, नृत्य, संगीत, अभिनयाचे कार्यक्रम



यांमध्ये बालकांचा उत्साहपूर्ण सहभाग होईल याची खात्री करणे व यासाठी व्यवस्था उपलब्ध करुन देणे.

२. बालकांची पुस्तके वाजवी किंमतीत उपलब्ध करुन देणे.

३. बालकांसाठी मनोरंजनात्मक असलेल्या सोयी आणि सुविधा पुरविणाऱ्या साधनांची पूर्तता करणे.

४. बालकांसाठी खेळांची मैदाने आणि अनुषंगिक सुविधा आरक्षित करण्याबाबतची कडक धोरणे तयार करणे.

## ७.९ संरक्षण

१. कोणत्याही परिस्थितीत, कायद्याच्या कचाटयात सापडलेल्या बालकांना सर्व प्रकारच्या हिंसा, गैरवर्तणूक यांपासून मुक्त करुन संरक्षित व संगोपनपूर्ण वातावरण निर्माण करणे. विविध स्वरुपातील हिंसाचार व गैरवर्तन, दुर्लक्ष, ठपका, भेदभाव, उपेक्षा, पिळवणूक (आर्थिक पिळवणूक व लैंगिक पिळवणूकीसह) सोडून देणे, वेगळे करणे, पळवून नेणे, एखाद्या उद्देशासाठी विकणे किंवा वाहतूक करणे, अश्लील चित्रपटांसाठी आणि इतर कोणतेही असे कृत्य ज्याद्वारे त्यांचा गैरफायदा घेतला जाईल किंवा त्यांच्या व्यक्तिमत्वावर आघात पोहोचेल आणि त्यांच्या विकासावर दुष्परिणाम होईल, या सर्व गोष्टींपासून त्यांचे संरक्षण करणे व याकरिता सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदे तयार करणे आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

२. बालकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या वाढीच्या काळात सर्व प्रकारच्या सुविधांसंबंधी विशेष पध्दती विकसित करणे तसेच बालकांच्या मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेचा प्राधान्याने विचार करणे.

३. संकटग्रस्त परिस्थितीत असलेल्या बालकांना मदत आणि सुरक्षिततेसाठी सोपा व तत्पर मार्ग शोधण्यासाठी मदत करणे. या परिस्थितीमध्ये अशा बालकांना अपेक्षित असलेले वैद्यकीय, पोषण, आसरा, मानसिक, कायदेशीर सहकार्य तत्परतेने पुरविणे.

४. बालहक्क प्रस्थापित करणे व ज्याने आपल्या कामात कुचराई केली आहे अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना किंवा संबंधित घटकांना शिक्षा देणे, तसेच

सर्व संदर्भात सुयोग्य समुपदेशन करणे.

५. पुनर्वसनामध्ये बालकांचे उपेक्षितपण, त्यांना फसविणे, वळी पाडणे यावर मात करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सेवा उपलब्ध करुन देणे. सर्व बालकांना आपल्या हक्कांची जाणीव करुन देणे. बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपाययोजना करणे.

## ७.१० सर्वसाधारण उपाय

१. विधीसंघर्षग्रस्त असलेल्या बालकांना संगोपन व संरक्षण यांची गरज आहे अशा बालकांना काळजी, संरक्षण आणि सुरक्षित वातावरण पुरविणे हे उद्दिष्ट घेऊन नुकतीच सुरु झालेली 'एकात्मिक बाल संरक्षण योजना' याला अधिक साहाय्य देऊन बाल संरक्षण व संगोपन कार्यक्रम बळकट करणे.

२. बालन्याय अधिनियम कायद्याच्या प्रभावीपणे अंमलबजावणीकरिता तालुका, जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर बालन्याय व्यवस्था बळकटीकरण करणे.

३. राज्यातील सर्व बाल–महिला विकास समित्या, बालन्याय मंडळे आणि जिल्हयातील विशेष बाल न्याय कक्ष यांचे कार्यावर विशेष लक्ष देणे तसेच याचे नेमणुका वेळेवर होईल याची खात्री करणे.

४. बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम, २००६ च्या कलम ३४ खालील शासनाच्या मान्यतेशिवाय चालविणारे बालगृह बंद करण्याची तरतूद असुन अशा व्यक्ती विरुध्द करावयाची कार्यवाही अधिनियमात नसल्यामुळे, यासाठी अधिनियमात सुधारणा करणे.

५. विधीसंघर्षग्रस्त बालकांना संवेदनशील अशी वागणूक संबंधित सर्व खात्यांनी, विभागांनी (बाल न्याय मंडळे, बाल कल्याण समित्या, पोलीस, बाल संगोपन केंद्रातील कर्मचारी) देतील याची खात्री करणे व यासाठी सर्व संबंधितांना जागृत करणे.

६. बालसंगोपन, बालकांची देखभाल व त्यांना कुटुंबात सामाविण्यासाठी प्रतिपालकत्वाच्या मोहिमेला प्रोत्साहन देणे तसेच संस्थात्मक, निवासी आणि कौटुंबिक स्वरुपातील घरांच्या गुणवत्तेची खात्री करणे.

७. आंतरराष्ट्रीय दत्तक घेणे हा बालकांच्या संगोपनाचा पर्याय मानला गेला आहे परंतू कोणत्याही बालसंगोपन किंवा दत्तक कुटुंबात बालक ठेवणे किवा देशात बालकाची काळजी उचितरित्या घेणे शक्य नसेल तरच हा आंतरराष्ट्रीय दत्तकाचा मार्ग बालकांच्या संगोपनासाठी वापर करणे.

८. सर्व सरकारी, निमसरकारी, स्वयंसेवी संस्था, संघटना यांनी पुरविलेल्या संगोपन सेवांची गुणात्मक मानके टिकवून धरण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद सुनिश्चित करणे.

९. बालहक्क संरक्षणासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची वेळेवर नेमणुकीची खात्री करणे आणि कर्तव्ये पुरेशा क्षमतेने पार पाडण्यासाठी त्यांना पुरेसा निधी वेळच्यावेळी देण्याबरोबरच इतर प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य उपलब्ध करुन देणे.

१०. बालक संरक्षण कार्यक्रमांच्या देखरेख आणि मूल्यमापनासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे.

११. सामाजिक संस्था व संघटनांबरोबर सुलभरीतीने भागीदारी करण्यासाठी धोरणांची निर्मिती करणे.

१२. पोटगी, पालकत्व, वारसपत्र, हिंसाचार व मालमत्तेचे वाद तसेच विधिसंघर्षग्रस्त बालकांशी संबंधित दिवाणी प्रकरणे, काळजी व संरक्षण अंतर्गत जर बालक न्यायालयात दाखल करतात किंवा बालकांचे प्रतिनिधी दाखल करतात तर त्यांना विशेषत: अनाथ बालकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींना न्यायालयाचे शुल्क माफ करणे.

१३. बाल सुधारगृह, अनाथालये इ. शासन अनुदान असणाऱ्या संस्थांचे अभिलेख स्कॅन करण्यात यावेत जेणेकरुन, या बाबी कायम स्वरुपी टिकविता येतील.

१४. परिवहन विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने महिला व बाल विकास विभागाच्या पुढाकाराने रस्ता सुरक्षा अभियान राबविणे, किशोरवयीन बालकांमध्ये

उपरोक्त विषयाबाबत जाणीवजागृती निर्माण करणे व रस्ता सुरक्षेचा शालेय अभ्यासक्रमातील नागरिकशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात येईल.

१५. प्रत्येक बालकास कौशल्यविकास, उपजत कलागुणांना वाव, उच्च शिक्षणाची संधी व त्यासाठी असणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षांसाठी प्रशिक्षणपर मार्गदर्शन उपलब्ध करणे.

१६. बालकांची विविध प्रकारची होणारी फसवणूक दुर्व्यवहार व त्यांचे दुष्परिणाम याबाबत बालक/पालक यांच्यात जाणीवजागृती करणे व याअनुषंगाने शाळा/आश्रमशाळा/महाविद्यालयात जाणीवजागृतीची सातत्यपूर्ण अंमलबजावणी करणे.

१७. एक कर्तव्यदक्ष नागरिक होण्याच्या दृष्टीकोनातून बालकांनी अंगिकारावयाची शिस्त व कर्तव्ये यांचा समावेश मुलांच्या शालेय अभ्यासक्रमात करण्यात यावा.

## ७.११ विशिष्ट बालकांसंबंधी उपाय

**सर्वसाधारण उपायांव्यतिरिक्त जी विशिष्ट परिस्थितीतील बालके आहेत, अशांना त्यांच्या भावनिक व मानसिक आधाराची दखल घेऊन विशिष्ट दृष्टिकोन आणि संरक्षणाची गरज आहे. हे उपाय पुढीलप्रमाणे राहतील -**

### १. हरवलेली बालके

क. सर्व प्रकारच्या हरवलेल्या बालकांबाबत प्राथमिक माहिती अहवालाची नोंदणी सक्तीचे करणे व प्राथमिक माहिती अहवालाच्या आधारावर तपासासाठी मानवी संसाधन व वित्तिय तरतूद पोलीस विभागाला देण्याची सुनिश्चिती करणे.

ख. हरवलेल्या बालकांसंबंधीचा केंद्रीय माहितीचा पाया बळकटीकरण करणे.

ग. पोलीस, बाल कल्याण समिती आणि स्वयंसेवी संस्था यांच्यासोबत हरवलेल्या बालकांबाबतची माहिती एकसंध ठेवण्याबाबत समन्वय साधणे.

घ. हरवलेल्या बालकांसाठी प्रमाणित क्रियान्वयन योजना (स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर) विकसित करणे.

### २. काम करणारी बालके

क. कोणत्याही स्वरुपातील बालकामगार पध्दतींना बंदी घालण्याच्या दिशेने राज्याने पाऊल टाकणे.

ख. बालकामगारांच्या योजना आणि त्यासंबंधीचे कायदे यांमध्ये शिक्षणाचा अधिकार कायद्याच्या दृष्टीने सुयोग्य बदल व आवश्यक असेलतर नवीन कायदे तयार करणे.

ग. सर्व कारखाने प्रक्रिया उद्योग आणि सर्व क्षेत्रांमध्ये एकही १८ वर्षांखालील बालक कामगार म्हणून काम करताना सापडणार नाही. याबाबत संबंधित यंत्रणेने सर्वतोपरी दक्षता घेणे.

घ. बालकामगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्व बालकांची मुक्तता करणे तसेच अशा बालकांच्या बाबतीत विस्तृत व काळजीपूर्वक नियोजन करुन त्यांची पुरेशी काळजी घेणे, शिक्षण व पुनर्वसन करणे, ती बालके समाजात पुन्हा योग्यपणे वावरु शकतील, याची सक्षम उपाययोजना करणे व ती प्रभावीपणे राबविणे.

ङ. बालकामगारांना मुक्त केल्यानंतर त्यांना बाल कल्याण समिती समोर सादर करण्याची सुनिश्चिती करणे व त्यांचे पुनर्वसन करण्याची व्यवस्था निश्चित करणे.

च कोणत्याही उद्योगात अथवा क्षेत्रात बालकामगार नसावेत या सकारात्मक सामाजिक संवेदनशील गोष्टीचा प्रसार करणे.



छ. सुटका केलेल्या बाल कामगारांची नोंदणी, त्यांचे पुनर्वसनाच्या संदर्भातील उपाययोजना, या बालकांना कामावर ठेवणाऱ्या मालकांविरुध्द कार्यवाही, सुटका केलेले बालकामगार उपाशी राहणार नाहीत व शिक्षणाच्या हक्कापासून वंचित राहणार नाहीत तसेच पुन्हा त्यांना काम करावे लागणार नाही याची खात्री व हमी देणे.

ज. जी बालके प्रयोगशील – कला, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक उपक्रम, पारंपरिक पध्दती, उद्योग आणि सामाजिक कायक्रम किंवा मनोरंजनाचे क्षेत्र यामध्ये गुंतलेली आहेत, त्यांना त्यांच्या सर्व हक्कांबद्दलची जाणीव जागृती करणे.

झ. कोणत्याही परिस्थितीत बालकांची पिळवणूक होणार नाही, त्यांना अनुचित वागणूक दिली जाणार नाही, त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जाणार नाही, यादृष्टीने बालक विकासाची मानके विकसित करणे, त्या पध्दतीने प्रत्यक्ष कार्यवाही होईल, याकडे लक्ष देणे, समन्वय साधणे व मार्गदर्शक तत्वे विकसित करणे.

ञ. महाराष्ट्र राज्यात सुटका केलेल्या बालकामगारांमध्ये इतर राज्यांच्या बालकामगारांचे प्रमाणे अधिक आहे. हे परराज्यातील बालक पालकांशिवाय अत्यंत दयनीय स्थितीत निर्वाह करीत असतात. सर्व राज्यांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे व त्याबाबत प्रयत्न करावे.

ट. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना व गरजूंना कामाच्या ठिकाणी किंवा जवळ असे पाळणाघर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मालकावर असावी.

ठ. १८ वर्षाखालील व्यक्तीस काम करण्यास सक्त बंदी (धोकादायक व अधोकादायक क्षेत्रात) लागू करावी.

ड. शाळेतील बालकांना व्यावसायिक प्रशिक्षणाबाबत मत/निवड करण्याचा विकल्प असावा व त्यांना भविष्यात उदरनिर्वाह करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण संधी उपलब्ध करुन दयावी.

ढ. बालकांची शारिरीक क्षमता वाढविण्याकरीता अधिक प्रयत्न करावेत.

ण. बाल मजूरीला प्रतिबंध करण्यासाठी बाल मजूर कुटुंबांना उत्पन्नवाढीच्या दृष्टिने विशेष लाभ देणे व त्यांना कायम उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देणे.

## ३. स्थलांतरीत व उपेक्षित बालके

क. ग्रामीण, शहर, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकेच्या हद्दीत कोणतेही मुल रस्त्यावर राहू नये, याकरिता पुरेशा सोयी पुरविण्याचा राज्य शासन प्रयत्न करील, रस्त्यावर राहणाऱ्यांमध्ये भीक मागणारे, झोपणारे, तसेच आंघोळ करणारे, कचरा वेचक यांचा समावेश होतो. राज्य शासनाने अहोरात्र काळजी घेणारी संगोपन केंद्रे वाढविणे, तसेच त्यामध्ये पोषण, संरक्षण आणि आरोग्य – बालकांना अन्नपुरवठा– या त्यांच्या गरजा पुरविण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

ख. रस्त्यांवरील, सार्वजनिक ठिकाणावरील व पुलाखालील राहणाऱ्या बालकांकरिता राज्य शासनाने त्यांच्या शिक्षण, पुनर्वसन आणि घर–कुटुंबाशी पुनर्मिलन यांसाठी सर्वंकष योजनेची रचना करणे व ती प्रभावीपणे राबविणे.

ग. बालहक्कांशी संबंधित अधिनियम, नियम व बालकांशी गैरवर्तणुकीसंबंधीचे गुन्हे हाताळणारे पोलिस, न्यायिक अधिकारी व शासकीय अभियोक्त्यांसाठी जागृतीचे विशेष कार्यक्रम राबविणे.

घ. रस्त्यांवरील बालकांना व सार्वजनिक ठिकाणी असलेल्या बालकांना तसेच बाल न्याय अधिनियम, २००६ अंतर्गत असलेल्या संस्थांतील बालकांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचे लाभार्थी म्हणून घोषित करणे.

ङ. धर्मादाय आयुक्त यांचे कार्यक्षेत्रात येणारी सर्व इस्पितळे या बालकांसाठी आस्थेने उपचार देतील. तसेच त्यांच्यावर त्वरित उपचार होण्यासाठी स्वतंत्र कक्षाची सुविधाही उपलब्ध करून देतील याची खात्री करणे तसेच असे उपचारित बालकांच्या अहवालांच्या प्रती संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व बाल हक्क संरक्षण आयोगास पाठवतील याची खात्री करणे.

च. ज्या बालकांना विशेषेकरून गैरवर्तणुकीने त्रस्त केले आहे त्या बालकांना संस्थात्मक रचनेमध्ये विशेष

काळजीची गरज आहे, अशा प्रकारच्या गैरवर्तणुकीच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कायम स्वरूपाचे पुनर्वसन कार्यक्रम राबविणे.

छ. बालकांकरीता चाईल्ड लाईनचा राज्यभर विस्तार करणे.

## ४. अनैतिक मानवी वाहतूक

### राज्यशासन खालीलप्रमाणे उपाययोजना योजिल:

क. अनैतिक मानवी वाहतूकीमधील परिणाम करणारे घटक निश्चित करण्यासाठी स्त्रोत आणि त्या मिळण्याच्या जागा यांतील संबंधांची योजना हाती घेणे व त्याचा आराखडा तयार करणे.

ख. अनैतिक मानवी वाहतुकीमधून बचावलेल्या बालकांचे, जगणाऱ्यांसाठी त्यांच्या पुनर्वसन आणि कौटुंबिक मीलन होण्यासाठी उपक्रम आखणे.

ग. देशातील इतर राज्ये आणि अन्य देशांबरोबर बचावलेल्या बालकांचे संगोपन, पुनर्स्थापना आणि स्वदेशी किंवा त्यांच्या राज्यात परत पाठविणे यासाठी संपर्काचे जाळे तयार करणे, विस्तारणे, आणि यासाठीच स्वतंत्र कृतीगट कार्यान्वित करणे.

घ. अनैतिक मानवी वाहतूकीविरूध्द असलेले सर्व कायदे आणि उपक्रम यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणांना बळकटीकरण करणे.

ङ. अनैतिक मानवी वाहतुकीतून बालकांची मुक्तता करण्यासाठी, आजारी असल्यास उपचार, सुधारणा



आणि स्वदेशी किंवा मातृराज्यात परतणे या दृष्टीने राज्य सरकारने अन्य राज्ये व अन्य देश यांच्याशी मुक्तता, परतणे व समाकलनाची प्रक्रिया (Recovery, Repatriation & Integration Process) यशस्वीपणे होतील, याकडे लक्ष देणे.

च. मुक्तता, परतणे व समाकलनाच्या प्रक्रियेत संबंधित विभागांचा सहभाग घेऊन नेमून दिलेल्या कृतीगटामध्ये चेतना आणणे.

छ दत्तकग्रहण नियमातील कोणत्याही प्रकारचे उल्लंघन हे अवैध मानवी वाहतूक म्हणून समजले जाईल याची जाणीव सर्वांना देणे व याकरीता आवश्यक कायदा तयार करणे किंवा असलेल्या कायद्यात सुधारणा करणे. तसेच याच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करणे.

ज. अनैतिक मानवी वाहतूक थांबविण्याकरीता प्रतिबंधक उपाययोजना निश्चित करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

## ५. शारीरिक व मानसिक दौर्बल्य असलेली बालके

### महिला व बाल विकास विभाग आरोग्य, शिक्षण व इतर विभाग, यांमध्ये उपचार वेळेवर होण्याच्या दृष्टीने योग्य तो समन्वय ठेवणे.

क. बालकांमधील शारीरिक व्यंग अथवा दौर्बल्याचे लवकर निदान होण्यासाठी संबंधित अधिकारी आणि कुटुंबाच्या याबाबतच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी कार्यक्रम राबविणे. तसेच याबाबत कोणताही भेदभाव केला जाणार नाही याची खात्री करणे.

ख. मुख्य प्रवाहातील कार्यक्रमांमध्ये या विशेष गटातील बालकांसाठी लक्ष केंद्रित करणे आणि त्याच वेळी राज्याने त्यांच्या वाढीसाठी तसेच विकासासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे.

ग. पायाभूत सुविधा, सेवा आणि बालक संरक्षण याकरिता ज्या संस्था शारिरीक दौबर्ल्य असलेल्या बालकांकरिता आहेत किंवा त्यांचेशी संलग्न आहेत, अशा संस्थांसाठी निश्चित धोरण तयार करणे.

घ. सर्व शहरांमध्ये, मानसिकदृष्टया आव्हान असलेली बालके, शिकण्याची दुर्बलता असलेली बालके यांच्याकरिता पुनर्वसन केंद्रे उभी करणे.

ङ. सर्व बालक संरक्षण धोरणांमध्ये या विशेष गटातील बालकांचा समावेश असल्याची खात्री करणे.

## ६. बालकांची उपेक्षा व गैरवर्तन / लैंगिक गैरवर्तन व दुर्लक्ष

क. बालकांशी लैंगिक व अन्य प्रकारचे गैरवर्तन केल्याच्या घटनांची नोंद करणे आणि त्याला प्रतिबंध करणे, यासाठी बालकांशी संबंधित असलेल्या सर्व परिसरात ठळक ठिकाणी विशिष्ट नियमांची माहिती प्रसारित करणे व जनजागृती निर्माण करणे.

ख. लैंगिक अपराध यापासून मुलांचे संरक्षण कायदा (२०१२) यामधील सर्व घटकांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांची कार्यवाही होत असल्याची निश्चिती व खात्री करणे.

ग. बालक संगोपन व संरक्षण विषयक संस्थांवरील निरंतर देखरेख व संस्थेची पाहणी करण्याची यंत्रणा सक्षम करणे.

## ७. संकटग्रस्त बालकांचे संरक्षण व विकास

क. नैसर्गिक आपत्ती किंवा संकटग्रस्त बालके, त्यांची कुटुंबे यांना तात्काळ आपत्कालीन साहाय्य, मानसिक आघातातून सावरण्यासाठी समुपदेशन व पुनर्वसन करणे तसेच बालके आणि त्यांच्या कुटुंबांना तात्काळ संरक्षण मिळवून देणे. तसेच तात्पुरते निवारा गृह उपलब्ध करून देणे

ख. ज्या बालकांचे पालक नैसर्गिक आपत्तीत अथवा अपघातात गंभीरपणे अपंग किंवा जखमी झालेले असतील किंवा मरण पावलेले असतील, अशा बालकांसाठी काळजी, पुनर्वसन आणि दत्तकग्रहण या धोरणांचा समालोचनात्मक आढावा घेणे व समालोचनात्मक परिक्षण करणे व त्यानुसार कार्यवाही करणे.

ग. संकट, आपत्ती व दंगल या संदर्भात उद्‌भवणाऱ्या परिस्थितीत बालक संरक्षणविषयक मूल्यमापन हाती घेणे. यातून बालकांना बाहेर काढण्यापूर्वीच या स्वरूपाचे मूल्यमापन करणे.

घ. संकट, आपत्ती व दंगल यांचा दुष्परिणाम झालेल्या बालकांसाठी प्रक्रिया, पुनर्वसन आणि मध्यस्थीला प्राधान्य देणारे कार्यक्रम आखणे तसेच सदर कार्यक्रम आपत्ती–व्यवस्थापनाचा अनिवार्य भाग राहील याची खात्री करणे.

ङ. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यांच्या पाल्यांची होणारी पिळवणूक व त्यांच्याबरोबर होणारे गैरवर्तन यापासून रोखणे, त्यांच्या एकूणच विकासासाठी त्यांना विविध कार्यक्रमांतर्गत सहभागी करून घेण्याची निश्चिती करणे.

## ८. कैद्यांची बालके, शरीरविक्रय व्यवसायातील महिलांची बालके व एचआयव्ही/एडस् द्वारे संसर्गित झालेली वा त्यांच्यावर तसा परिणाम झालेला आहे, अशांची बालके तसेच सिकलसेल यामुळे दुष्परिणाम झालेली बालके:

क. कैदी व शरीरविक्रय व्यवसायात गुंतलेल्या महिलांची बालके, देवदासी व तमाशा कलावंतांची बालके, एचआयव्ही/एडसबाधित व सिकलसेलबाधित बालके आणि अनाथ बालके यांच्या संरक्षणासाठी विशेष तरतूद करणे, या बालकांमधील भावनिक व शारिरिक आघात मापण्यासाठीची व्यवस्था आखणे आणि त्यांच्या कुटुंबाला सहकार्य देण्याला अग्रक्रम देणे व काळजी घेणे.

ख. कुटुंबे, बालगृहे, शाळा, इस्पितळे आणि इतर सार्वजनिक ठिकाणी एचआयव्ही/एड्स, सिकलसेलग्रस्त तसेच तत्सम आजार बाधित बालकांशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाऊ नये, यासाठी योग्य उपाययोजना हाती घेणे, उपरोक्त सर्व ठिकाणी सामिलीकरणाकरिता विशेष प्रयत्न करणे व त्यांची काळजी घेण्यासाठी बालगृहांमधील सुधारणांचा दर्जा उंचावणे.

ग. एचआयव्ही/एड्स, सिकलसेल व तत्सम आजार यांचा दुष्परिणाम झालेल्या बालकांच्या कुटुंबांवर तसेच समुदायावर आधारित कार्यक्रमांना महत्व देणे. ज्यावेळी हे करणे शक्य नसेल, त्यावेळी फक्त

संख्यात्मक संगोपनाच्या माध्यमातून लक्ष पुरविणे.

घ. एचआयव्ही/एडस, सिकलसेलशी व तत्सम आजारासंबंधित बाधित झालेल्या बालकांच्या खटल्यांमध्ये, ज्यामध्ये पोटगी, पालकत्वाची जबाबदारी, वारसपत्र, हिंसाचार आणि संपत्तीचे वादविवाद यांचा समावेश आहे, तेथे अशा बालकांना न्यायालयीन शुल्कातून सूट देणे.

## ९. अनाथ आणि निराश्रित बालके

क. अनाथ आणि निराश्रित बालकांसाठी संस्थात्मक सेवा, संस्थाबाहय सेवा, कौटुंबिक किवा सामूहिक सहभागावर आधारित कार्यक्रमांना अग्रक्रम देणे. या बालकांना कुठल्याही कार्यक्रमात समाविष्ट करताना त्यांच्या गरजांचे बहुव्यापी मूल्यमापन करुन घेणे. अशा प्रतिपालन करणाऱ्या कुटुंबांना पुरेसा निधी पुरविणे व हे करणे जर षक्य नसेल, त्यावेळी अशा बालकांना संस्थात्मक संरक्षण देणे.

ख. एखाद्या बालकाला प्रतिपालक किवा दत्तक कुटुंब किंवा त्याच्या मूळ देशात काळजी घेणारी योग्य व्यवस्था नसेल, तरच अशा बालकांच्या काळजीसाठी आंतरराष्ट्रीय दत्तकग्रहण हा पर्याय समजणे.

## १०. संस्थेतील बालके

क. बालकांसाठी मोठया संख्येने असलेल्या संगोपन व संरक्षण संस्था लक्षात घेता, विशिष्ट कालावधीमध्ये संस्थात्मक संगोपनाच्या संदर्भात राज्याने सर्वंकष असे धोरण कालबध्द मर्यादित विकसित करणे.

ख. संस्थाबाहय बालसंगोपन व संरक्षण योजना व संस्थांची (बालसंगोपन, देशांतर्गत दत्तकग्रहण आणि प्रतिपालन) यादी अग्रक्रमाने बनविणे.

ग. अस्तित्वात असलेल्या संगोपन व संरक्षण संस्थांची, वार्षिक योजना व आराखडे यांचा आढावा घेणे.

घ. सर्व विभागातील संस्थांमध्ये संगोपनाची व संरक्षणाची व्यवस्था प्रमाणित असावी अशी खात्री करणे.

ङ. संस्थांच्या निरंतर देखभाल, नियंत्रण व विकासासाठी, त्याचे अहवाल तयार करण्यासाठी व देखेरेखीसाठी प्रभावी यंत्रणा ठेवणे. तसेच बालकांच्या याबाबतची प्रतीक्षा यादी संबंधित जिल्हयाच्या बाल कल्याण समितीस वेळोवेळी देणे.

च. सर्व संस्थांकरिता बालक संरक्षण धोरण निश्चित करणे.

छ संस्थांमध्ये नोंदणीचे निकष आणि संगोपनाचा दर्जा यांची व्याख्या करणे आणि त्या पूर्ण होतात की नाही याची खात्री सुनिश्चित करणे.

ज. संगोपनाचा दर्जा सुयोग्य स्तरावर राखण्यासाठी राज्याने पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.

झ. संस्थेतील प्रत्येक बालकाच्या वैयक्तिक देखभालीकरिता नियोजन आराखडा तयार करणे, यात नियमितरित्या अपेक्षित पुनर्वसन व कौटुंबिक समायोजनाकरीता नियमांचा समावेश करणे. बाल कल्याण समितीद्वारे सदर नियोजन व नियम सातत्याने अद्ययावत ठेवणे व त्याचे परीक्षण करणे.

ञ. परिवीक्षा काळानंतर देखभालीसाठी सर्वंकष मार्गदर्शक तत्वे विकसित करणे, कृति कार्यक्रम ठरविणे आणि राबविणे.

ट. संस्थेतील सर्व बालकांचे व्यवस्थापकीय नोंदणी योजना चांगल्या अवस्थेत राखणे.

ठ. राज्याने वसतीगृहे, समूहघरे आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्था यांच्याशी पुरेसे संपर्काचे जाळे स्थापन करणे, ज्याद्वारे संस्थेतील बालके घराबाहेर त्यांचे स्वतंत्र आयुष्य चांगल्या मार्गाने जगतील याची खात्री करणे.

ड. संस्थेतील बालकांशी गैरवर्तन, दुर्लक्ष आणि पिळवणूक झालेल्या सर्व घटना अतिशय गांभीर्याने हाताळणे, अशा संस्थांच्या अधिकाऱ्यांविरूध्द एफआयआर नोंदविणे आणि या प्रकाराची बारकाईने चौकशी होईल याची खात्री करणे.

## ११. संस्थात्मक व संस्थाबाहय बालकसेवा

क. सर्व बालकांना त्यांच्या पालकांकडून समजण्याच्या आणि काळजी घेतली जाण्याचा अधिकार आहे, ज्याद्वारे ते पिळवणूकरहित आणि प्रतिष्ठेचे जीवन जगतील. अशा कुटुंबांना त्यांच्या मुलांचे संगोपन करण्यासाठी, पालनपोषणाकरिता सामाजिक सुरक्षेची सशक्त व्यवस्था मदतीला उभी करणे.

ख. बिगर संस्थात्मक कार्यक्रमात कुटुंबांना बळकट करण्यास अग्रक्रम देणे.

ग. बालसंगोपन योजना विकसित करण्यासाठी सर्वंकश मार्गदर्शक तत्वे आणणे आणि ही योजना नियोजित पध्दतीने राबविणे

घ. बिगर संस्थात्मक कार्यक्रम पुरविणाऱ्या संस्थांचे बहुव्यापक मूल्यमापन करुन आवश्यक असल्यास नोंदणी करणे.

ङ. संस्थेने नोंदविलेल्या सर्व नोंदींच्या प्रती संगणकीकरणाच्या माध्यमातून सुरक्षित ठेवणे. त्या महिला व बाल विकास विभागाने आपल्या दफ्तरखान्यात सुरक्षित ठेवणे.

च. ज्या अनाथ बालकांची नावे माहित नाहीत अशांची नोंद अनामिक (Name Not Known) ठेवण्याची प्रथा बंद करण्यात येऊन त्यांचे नाव देणे बंधनकारक करणे.

छ. अशा बालकांसाठी अनुरक्षण कार्यक्रम (आफ्टरकेअर) अधिक व्यापक, सक्षम करण्यात येऊन त्यात निवास, भोजन, शिक्षण, प्रशिक्षण, जीवनकौशल्य, पुनर्वसन, सेवायोजन, कायदेशीर विवाह इत्यादी बाबींचा अंतर्भाव करणे.

ज. अनाथ बालकांचा जनगणनेमध्ये समावेश करण्याची खात्री करणे

झ. अनाथ बालकांसाठी समांतर आरक्षणाचा विचार शासन करेल अशी खात्री देणे.

## १२. विधी संघर्ष बालके

क. कायद्याच्या संघर्षात असलेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी सर्वंकष मार्गदर्शक तत्वे विकसित करणे.

ख. कायद्याच्या कचाटयात सापडलेल्या बालकांसाठी विशेषगृहे उभारणीचा आराखडा आखणे आणि त्यात त्यांना विविध सेवा–प्राथमिक समुपदेशन, शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण या इतर सेवांच्या बरोबरीने देणे. ज्या संस्था अशा प्रकारच्या सेवा पुरवितात, अशा संस्थांबरोबर एकत्र काम करण्याची खात्री देणे. पोलीस यंत्रणेला याबाबत सचेतित करणे.

ग. पायाभूत सुविधा आणि प्रक्रिया उभ्या करताना बाल न्याय मंडळांची जागा बालकांना मित्रत्वाची, आपुलकीची वाटली पाहिजे अशी व्यवस्था निश्चित करणे.

घ. विधिग्रस्त मुलांचे प्रकरण हाताळणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना जागरूक करणे.

## ७.१२ सहभागित्व

क. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिवेशनात बालहक्कांची जी आगाऊ तरतूद केलेली आहे, ती राज्याने पाळणे, बालक हे स्वत:ची मते तयार करण्यास समर्थ असते म्हणून त्याची मते व्यक्त करण्यासाठी पोषक वातावरण पुरविणे. त्याच्या आयुष्याशी संबंधित निर्णय घेताना बालकाचे मत विचारात घेतले जावे यासाठी राज्याने सर्व प्रकारच्या उपाययोजना राबविणे.

ख. बालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आणि इच्छा आकांक्षा व्यक्त करण्यासाठी सर्व शाळा, गावे, संस्था, गृहनिर्माण वसाहती तसेच इतर वसाहती येथे बालकांच्या संस्था व क्लब स्थापन करणे. त्याप्रमाणे स्वायत्त संस्थेखालील बालकांचे संबंधित समितीमध्ये उपसमिती तयार करुन बालकांना त्यात स्थान देणे. सदर कार्याच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्याचे अधिकार बाल हक्क संरक्षण आयोगाचे राहिल.

ग. बालकांची मते व्यक्त करण्याची यंत्रणा सर्व संबंधित संस्था व विभागात सुयोग्य रीतीने उभी करणे.

घ. बालकांशी चर्चा आणि सहभागित्व यासाठी सर्व बालक संरक्षणविषयक कार्यक्रम, नियम, प्रक्रिया यांमध्ये सुविधा असणे.

ङ. बालकांच्या निरागसतेचा आणि अगतिकतेचा गैरलाभ घेऊन कोणत्याही स्वरुपाचे आर्थिक, सामाजिक व इतर फायद्यांसाठी (जसे प्रतिष्ठा मिळविणे इत्यादि) बालकांचे वापरावर प्रतिबंध घालणे.

च. ज्या निर्णयांचा बालकांवर काही परिणाम होऊ शकतो किंवा त्यांच्या हक्कांवर अतिक्रमण होत असते, अशा वेळी बालकांचे सर्वोच्च हित लक्षात घेऊन निर्णय घेणे.

छ. संयुक्त राष्ट्रसंघ बालहक्क सनदेच्या अंतर्गत नियमांना अनुसरून राज्याने बालक सहभागित्वाचे मार्गदर्शक आणि संस्थात्मक असे नमुना प्रकल्प बनविणे.

ज. बालक सहभागित्व या संकल्पनेच्या समर्थनार्थ राज्याने प्रशिक्षण, माहिती आणि संसाधने संस्थांना पुरविणे आणि बालहक्कांच्या प्रति पूर्ण दायित्वाची निश्चिती करणे.

झ. बालहक्क कायदे आणि धोरणे याबद्दलची माहिती सुलभ आणि बालकांना समजणाऱ्या सोप्या भाषेमध्ये



सर्व शाळा व संस्थेमध्ये उपलब्ध राहतील याची खात्री देणे. तसेच शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात त्याचा समावेश करणे.

## ७.१३ मुलींविषयी विशेष आस्था व काळजी

१. मुलींच्या सर्वांगीण विकास आणि संरक्षण यासाठी जीवनक्रमाचे चक्र लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सुयोग्य आरोग्य, शिक्षण आणि जीवनकौशल्य देणाऱ्या वैशिष्टयपूर्ण उपाययोजना राबविणे.

२. कुटुंबात आणि शिक्षण सुविधांमध्ये मुलींना समान संधी मिळणे.

३. बेकायदेशीरपणे मुलीची हत्या आणि लिंगनिदान करुन केलेली हत्या यांबाबत शून्य सहनशीलता (एकाही मुलीची हत्या अथवा लिंगनिदान करुन केलेली हत्या होणार नाही या दक्षतेने) असणारे कडक धोरण राज्याने स्वीकारणे. नागरी संस्था यांचे सहभागाने गर्भावस्थेपूर्वी व गर्भावस्थेतील (लिंगनिदान प्रतिबंधक) कायदा, (१९९४) राबविण्यासाठी मूल्यांकन व देखरेखीकरिता असलेल्या धोरणाची कडक अंमलबजावणी करणे.

४. मुली व युवतींचे आर्थिक सहभागित्व वाढविण्यासाठी त्यांचे कौशल्यपूर्ण गट बांधले जाईल याची खात्री करणे व सदर कार्यक्रम मानवी संसाधनाच्या गरजा याच्याशी जोडले जाईल याची निश्चिती करणे.

५. लैंगिक समानता या विषयावर सर्व सरकारी उपक्रम आणि योजना हे प्रसिध्दीस जाण्याआधी त्याचे परीक्षण करणे आणि विशिष्ट लैंगिकतेशी निगडित परिणाम यातून ओळखणे आणि पूर्णत्वास नेणे.

६. लैंगिक भेदभाव टाळण्यासाठी शाळेच्या, कनिष्ठ महाविद्यालयाच्या व महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन करणे. त्याचप्रमाणे अशा विषयावर ज्यामुळे लैंगिक पक्षपात होऊ शकतो, त्याला वगळण्यासाठी या सर्व विषयांची तपासणी स्वतंत्र समितीमार्फत केली जाईल याची खात्री करणे.

७. मुलींविरूध्दचे गैरवर्तन, अन्याय कमी करण्यासाठी वारंवार जाणीवजागृतीचे कार्यक्रम लोकसमुदाय, पालकशिक्षक समिती, वकील, पोलीस, शासकीय अभियोक्ता व न्यायाधिश यांचेकरीता आयोजित करणे.

८. बालविवाह प्रतिबंधक कायदा, (२००६) प्रभाविपणे राबविण्याची निश्चिती करणे तसेच बालविवाह रोखण्यासाठी संबंधित पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी हे त्वरीत कायद्यानुसार कार्यवाही करतील याची सुनिश्चिती करणे.

९. मुलींच्या अधिकारांचा सन्मान न करणाऱ्या सामाजिक परंपराविरूध्द प्रभावी व आक्रमक संवाद मोहिमा हाती घेऊन त्याची अंमलबजावणी करणे.

१०. बाल विवाहाला प्रतिबंध करणाऱ्या मोहिमा योजणे आणि त्या कडकपणे राबविणे.

११. प्रत्येक जिल्हयात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मुलींसाठीच्या स्वतंत्र संस्थांची स्थापना करणे.

१२. सुदृढ बालक जन्म घेण्यासाठी सुदृढ माता आवश्यक आहे, त्यासाठी किशोरवयीन मुलींच्या व्यवस्थित विकासासाठी आहार, आरोग्याचे नियोजन करण्यावर राज्यशासन विशेष लक्ष देईल तसेच प्रशिक्षण प्रबोधन द्वारे तीला सक्षम स्त्री व माता बनवण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करील.

# ८. भागीदारी, समन्वय आणि समर्थन

सर्व पातळयांवरील महत्वपूर्ण घटकांशी संबंधित बालकांच्या समन्वयास उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय राबविताना उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि विकेंद्रीकरण याकडे शासनाने लक्ष दयावे यासाठी भागीदारी, समन्वय आणि समर्थन हे तीन प्रमुख घटक केले आहेत.

## ८.१ भागीदारी

अ. समाजातील सर्व संबंधित घटकांच्या समन्वयावर भर देण्यासाठी, कामगार संघटना, मालक, न्यायालयीन अधिकारी, देशातील व परदेशातील स्वयंसेवी संस्था, संयुक्त राष्ट्रसंघाच्या संबंधित शाखेचे प्रतिनिधी, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांचे प्रमुख, जनसंपर्क माध्यमांचे प्रमुख आणि खाजगी उद्योजकांचे प्रतिनिधी यांचा यात समावेश राहील याची सुनिश्चिती करणे.

आ. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित विभागामधील समन्वयाची खात्री शासन देईल.

इ. अति संवेदनशील भाग, मागास भाग, बालकामगार असलेला परिसर, अतिसंवेदनशील समूह, यादवी परिस्थिती असलेली क्षेत्रे यांची निश्चिती करणे व अश्या क्षेत्रांचा विकास कार्यक्रम तयार करणे, उपाययोजना निश्चित करणे व कार्यक्रमांच्या देखरेखीसाठी स्वयंसेवी संस्था, सामुदायिक संगठन यांच्याबरोबर भागीदारीची निश्चिती राज्य शासन करेल.

## ८.२ समन्वय

क. बालक धोरण राबविण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एका कृती समितीची स्थापना करण्यात येईल. सदर समितीचे सदस्य सचिव महिला बालविकास विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव हे असतील. या समितीत संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्था, खाजगी उद्योजकांचे प्रतिनिधी व शैक्षणिक संस्था यांचे प्रतिनिधी व तज्ञ हे राहतील.

ख. बाल धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्याकरिता राज्य स्तरावर मा. मंत्री, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा समिती राहील. या समितीमध्ये संबंधित विभागाचे मा. मंत्री सदस्य असतील तर सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून महिला व बाल विकास विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव हे राहतील.

ग. धोरण राबविण्याच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि संबंधित विभागांना पुढील आदेश देण्यासाठी दर सहा महिन्यांतून एकदा आढावा समितीची बैठक होईल.

घ. धोरण राबविण्याच्या भविष्यकालीन कृतीला दिशा देण्यासाठी दर तीन महिण्याला कृती समितीची बैठक होईल. या बैठकीत प्रत्येक विभागाने त्यांच्या कामाचा प्रगती अहवाल आणि भविष्यासाठी कार्य योजना सादर करतील. या कृती समितीला व आढावा समितीला, राज्य आणि विभागीय पातळीवर देखरेखीसाठी उपसमित्या नेमता येतील. त्यात विभागीय आयुक्तांनाही घेता येईल. राज्यशासनाचे महिला बालविकास खाते हे धोरण राबविण्याचे समन्वय केन्द्र राहील. या खात्याने संबंधित सर्व विभाग व महत्वाचे घटक यांच्याबरोबर समन्वय साधून निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करतील.

ङ. कार्यक्रम राबविण्यासाठी आणि त्याचा आढावा घेण्यासाठी जिल्हा पातळीवरील समन्वय समित्या स्थापन करण्यात येईल.

### ८.३ समर्थन

क. या बालक धोरणाला ठळक समर्थन देणारी उपाययोजना आखताना त्यात बालकांचे हित आणि अधिकार यांना प्राधान्य देण्यात येईल. यामध्ये धोरण, योजना संसाधने, कारभार देखरेख आणि मूल्यमापन यांचा समावेश करण्यात येईल, तसेच या सर्व विषयांमध्ये बालकांची मते, त्यांचे दृष्टकोन तसेच त्यांच्या आयुष्यावर ज्याचा परिणाम होतो, अशा गोष्टींची दखल व नोंद घेऊन कृतीची भूमिका घेतली जाईल.

ख. बालहक्कांवरील जाणीवजागृती आणि ते साध्य करण्यासाठीची जबाबदारी यांकरिता या संबंधातील सर्व महत्वपूर्ण घटकांनी (बालके, संस्था, तज्ञ व सरकार) हक्काधारित आणि समानतेला केन्द्रस्थानी मानून व्यूहरचना, व्यासपीठ, कार्यक्रम, प्रसिध्दीमाध्यमे आणि साधने यांना प्रोत्साहन देणे.

ग. सेवा पुरविणाऱ्या व्यवस्था व सहभागित्व, प्रतिसादात्मक आणि बालकांशी संवेदनशील, पारदर्शी आणि सामाजिक दायित्व पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम करतील याची खात्री शासन करेल, याच संदर्भातील राज्य व विभाग स्तरावरील योग्य पध्दतीने वापर करुन शिकविण्यासाठी गटसमूहाचे संपर्कजाळे उभारण्यात येईल.

घ. विविध प्रसिध्दीमाध्यमातून या धोरणाला मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात येईल. तसेच बालकांच्या संबंधातील लिखाणाकरिता प्रसिध्दीमाध्यमांनी पुरेसे महत्व देणे.

ङ. राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवर बालपंचायत निर्माण करणे, ज्याद्वारे मुलांवर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये बालकांचा सहभाग वाढविणे शक्य होईल.

च. बालहक्काचे धोरण याची ओळख विद्यार्थ्यांना देण्याकरीता शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा महाविद्यालयीन पातळीवर बालहक्कांचे धोरण, नियम अधिनियम यांचा समावेश अभ्यासक्रमात करणे.

## ९.संशोधन, दस्तावेज आणि कार्यक्षमता

क. बालकांचा दर्जा, स्थिती, अवस्था व इतर समस्या यांच्यावर आधारित गुणात्मक व संख्यात्मक बाबींवर, व्यापक आणि अवलंबून राहण्यासारखे बालकेन्द्रित संशोधन तसेच दस्तावेज यावर विकसित झालेल्या ज्ञानाचा पाठिंबा या धोरणाच्या अंमलबजावणी करीता राहील.

ख. सर्व क्षेत्र व सर्व विभाग खालील सर्व प्रकारच्या बालकांबाबत सर्व पैलूंसंदर्भात कार्यक्रम, व्यवस्थापन, कार्य आणि संगोपनची सुविधा बालकांना मिळावी याकरीता तांत्रिक व व्यवसायिक कार्यक्षमतेच्या विकासाची खात्री देणे

ग. बालकांच्या विविध विषयावर संशोधनासाठी राज्यस्तरीय संशोधन केंद्राची स्थापना करण्यात येईल तसेच राज्यस्तरीय संशोधन केन्द्र जास्त व्यापक व सर्जनशील स्वरुपाचे राहील. संशोधन केन्द्र मुख्यत: बाल केन्द्रित विषयावर जसे बालहक्क, आरोग्य, शिक्षण, सहभागिता इत्यादी गुणवत्ता ठेऊन संशोधन कार्य करेल.

## १०. संसाधन वाटप

क. धोरण राबविण्यासाठी आर्थिक, भौतिक आणि मानवी संसाधन यांची वाटणी पारदर्शकपणे आणि त्यांच्या चांगल्या आणि प्रभावी उपयोगासाठी करण्याकरीता पुरेशी तरतूद करणे.

ख. बालकांविषयी अर्थसंकल्पित झालेल्या संसाधनाचे वाटप व खर्च, बालकांपुरता कितपत केला जात आहे याची खात्री करणे व या संसाधनाचे उपयोगामुळे बालकांवर होणारा प्रभाव याची पडताळणी करणे.

## ११.राज्य बाल संसाधन केंद्र

राज्य संसाधन केन्द्र महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत राहील व सदर संसाधन केन्द्रासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग समन्वयक (नोडल एजन्सी) म्हणून काम करेल. राज्य बालक संसाधन केंद्राचे कार्य पुढीलप्रमाणे राहील:

क. बालकांबद्दलची सर्व माहिती जमा करणे व ती संकलित करणे.

ख. याबाबतच्या महत्वपूर्ण घटकांचे (बालक, संस्थाचालक, अधिकारी, तज्ज्ञ इ.) सहभागित्व नियोजनात वाढविणे व धोरणाचे परीक्षण करणे यासाठी त्यांची यादी करणे व त्यांच्याबरोबर सातत्याने बैठका घेणे.

ग. या धोरणाच्या अंमलबजावणी करणाऱ्या घटकांना आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविणे.

घ. कोणत्याही स्वरूपाचा आघात असलेल्या बालकांबरोबर वावरताना त्यांचे अनेक विषय जाणणे व त्यांच्यासाठी काम करताना संवेदनशील असा दृष्टिकोन ठेवणे.

ङ. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाला शिफारशी करणे.

च. चांगल्या कृतीचे व उपक्रमाचे दस्तावेज तयार करणे.

छ. या धोरणावर तसेच धोरणाच्या अंमलबजावणीवर समालोचनात्मक मूल्यमापन करणे आणि मूल्यमापनाच्या निष्कर्षांच्या आधारावर भविष्यामध्ये धोरणात सुधारणा करण्याची शासनास शिफारस करणे.

ज. या धोरणाच्या अंमलबजावणीचे सामाजिक लेखा परीक्षण करणे.

## १२. बाल विकास निधी

राज्य शासन "बाल विकास निधी" ची तरतूद करतील व "बाल विकास निधी" खालील जमा निधीचा वापर धोरणात नमूद बाबीप्रमाणे कृती साठी करण्यात येईल.

## १३.बाल धोरणाची उद्दिष्टे

१) प्रत्येक बालक राज्याकरीता अनन्यसाधारण व अतिमहत्वाचा घटक आहे.

२) सामाजिक परिस्थितीमुळे बालकांवर होणारे अन्याय, भेदभाव व असमानता दूर करण्याकरीता सुधारात्मक उपाययोजना व सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३) कुटुंब किंवा कौटुंबिक वातावरणात संगोपन, विकास व वाढीची संधी, तसेच संरक्षण, प्रेम व काळजी घेण्याच्या संधीचे हक्क व सहभाग प्रत्येक बालकाला आहे.

४) बालकाच्या काळजी व त्यांचे पालनपोषणासाठी सामाजिक सुरक्षा व सुविधा यांचे पाठबळ कुटुंबाला दिले जाईल.

५) चांगले शिक्षण, सकारात्मक दृष्टिकोन, आदर्श, कौशल्ये आणि सामाजिक मूल्यांची बांधिलकीची जाणीव असणारा बालक वर्गच पुढे सामाजिक मूल्यांप्रती प्रामाणिकता जपणारा प्रौढ व्यक्ती बनू शकेल, जो आपल्या समुदायाच्या आर्थिक आणि सामाजिक विकास व सांस्कृतिक संरक्षणाकरिता विधायक योगदान द्यायला तयार राहील म्हणून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व बालकांचे असणारे योगदान आणि त्या अनुषंगाने असणारे बालकांच्या संरक्षणासाठीचे व सर्वांसाठी समान संधीची हमी देण्याकरीता महाराष्ट्र राज्य बांधील राहील.

६) प्रत्येक कायदा, नियम, अधिनियम, योजना, कार्यक्रम याची सर्वांना माहिती तसेच मार्गदर्शन हे धोरण करेल.

७) स्थानिक, जिल्हा विभागीय व राज्यस्तरावर जी काही कार्यवाही केली जाईल किंवा कार्यवाही करण्यात पुढाकार घेतला जाईल ही सर्व कार्यवाही व पुढाकार या धोरणात नमूद तरतूदींच्या आधारे केली जाईल.

बाल विकास धोरण २०१३ चा मसुदा अंतिम करण्यासाठी कालबध्द नियोजन व त्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र.बालआ-२०१२/ प्र.क्र.२५३/का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ मे, २०१३.

**प्रस्तावना :** महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोग व मानव विकास केंद्र, यशदा, पुणे यांचेकडून नवीन बाल धोरणाचा मसुदा शासनास प्राप्त झाला आहे. सन १९७४ साली प्रथम बालधोरण तयार करण्यात आले. तदनंतर २००२ मध्ये त्यात सुधारणा करून नवीन बाल धोरण तयार करण्यात आले. युनिसेफमार्फत उपरोक्त दोन्ही मसुदयांचे राष्ट्रीय बाल धोरणासमवेत एकत्रीकरण करण्यात आले आहे. सदर मसुद्यांवर विविध तज्ञांचे ई मेल संदेशाद्वारे अभिप्राय मागविण्यात आले असून त्यांचा समावेश असलेला नवीन मसुदा शासनास प्राप्त झाला आहे. सदर मसुद्यास अंतिम करण्यासाठी कालबध्द नियोजन व त्यासाठी समिती गठीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :** राज्यासाठी बाल विकास धोरण २०१३ चा मसुदा अंतिम करण्यासाठी खालीलप्रमाणे कालबध्द नियोजन व त्यासाठी समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

१. राज्यासाठी बाल धोरण २०१३ करण्यासाठी nodal agency म्हणून सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांना जबाबदारी सोपविण्यात येत आहे. तर धोरणाच्या अनुषंगाने राज्य कृती आराखडा करण्याची जबाबदारी यशदा, पुणे यांच्यावर सोपविण्यात यावी. धोरण व धोरणावर आधारीत कृती आराखडा (Action Plan) हा समांतरपणे तयार करण्यात यावा.

२. युनिसेफमार्फत तयार करण्यात आलेल्या मसुद्यावर औरंगाबाद, पुणे व नागपूर या ठिकाणी बाल हक्क आयोगामार्फत विभागीय चर्चासत्र आयोजित करण्यात यावेत. ज्यामध्ये स्थानिक स्वयंसेवी संस्था, बाल विकासाशी संबंधित तज्ञ, महाविद्यालये / विद्यापीठे तसेच विविध बाल विकास संशोधन संस्था (TISS, कर्वे इन्स्टिटयूट) यांचे प्रतिनिधी, स्थानिक शासकीय अधिकारी, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग), बाल कल्याण समिती सदस्य तसेच ज्या ठिकाणी

शक्य असेल तेथे प्रत्यक्ष बालकांचा समावेश करण्यात यावा. विभागीय चर्चासत्रे सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग यांनी आयुक्त, महिला बाल विकास यांच्या सहाय्याने आयोजित करावीत.

३. विभागीय चर्चासत्रे तसेच धोरण मसुद्याच्या भाषांतर, छपाई इतर किरकोळ खर्चाची जबाबदारी युनिसेफ, मुंबई यांची असून आयुक्त, महिला बाल विकास यांनी त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी.

४. क्षेत्रीय चर्चासत्रानंतर मुंबई चर्चासत्रात बाल धोरणाचा मसुदा अंतिम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मंत्री | अध्यक्षा |
| २. | राज्यमंत्री | सदस्य |
| ३. | सौ. निर्मला रमेश गावीत, वि.स.स., मु.पो.ता.नाशिक. | |
| ४. | मा. ॲड. श्रीमती यशोमती ठाकूर, वि.स.स., मु.पो.मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती. | |
| ५. | कुमारी प्रणिती सुशिलकुमार शिंदे, वि.स.स., १९,अशोकनगर,विजापूर रोड,सोलापूर. | |
| ६. | श्रीमती. ॲनी शेखर, वि.स.स., सी.ब्लॉकर६/१६-अ,अमरचंद मॅन्शन,मादाम कामा रोड, मुंबई.४०० ००१. | |
| ७. | श्रीमती शामल दिगंबरराव बागल, वि.स.स., मु.पो.मांगी,ता.करमाळा,जि.सोलापूर | |
| ८. | मा.श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स. | |
| ९. | श्रीमती. माधुरी सतिश मिसाळ, वि.स.स., सं.नं.५७४,रम्यनगरी डी-६ बिल्डींग, बिबवेवाडी, पुणे.४११ ०३७ | सदस्य/विपस/विसस |
| १०. | श्रीमती पंकजा गोपीनाथराव मुंडे-पालवे, वि.स.स., मु.नाथ,पो.कोडळी, ता.परळी,जि.बीड. | |
| ११. | सौ.मिरा कल्याणराव रेंगे, वि.स.स., मु.पो.जांब,ता.जि.परभणी. | |
| १२. | श्रीमती. मिनाक्षी प्रभाकर पाटील, वि.स.स., मु.आंबेपूर, पेझारी,पो.पोयनाड, ता.अलिबाग,जि.रायगड. | |
| १३. | मा. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स., १०२, वसंत वैभव, मॉडेल कॉलनी, लकाकी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६. | |
| १४. | श्रीमती अलकाताई देसाई , वि.प.स., बिल्डींग नं.२३४, रुम नं. ९१६२, कन्नमवार नगर नं.२, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३. | |
| १५. | मा. श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. , साईदर्शन, ३ रा मजला, परांजपे स्कीम, बी-३, हनुमान रोड, विलेपार्ले (पुर्व), मुंबई ४०० ०५७. | |
| १६. | मा.श्रीमती शोभाताई फडणवीस , वि.प.स., मु.पो. मुल, तालुका- मुल, जिल्हा चंद्रपूर. | |
| १७. | मा. डॉ. निलम गोऱ्हे , वि.प.स., सिल्व्हर रॉक, हरेकृष्ण मंदिर पथ, मॉडेल | |

| | | | |
|---|---|---|---|
| | कॉलनी, पुणे ४११ ०१६. | | |
| १८. | श्री. हेमंत टकले, आमदार ( ९८२२०५२४३३/९२२५१००७९८ ) | | |
| १९. | प्रधान सचिव, महिला बाल विकास विभाग | सदस्य | |
| २०. | श्रीमती विना लष्करी , Doorstep School, Mumbai. ( ९८२१०५८६५५) | | सदस्य |
| २१. | श्री. सुर्यकांत कुलकर्णी, प्रभादेवी, मुंबई. (९८२२००८३००) | | सदस्य |
| २२. | श्रीमती मेरी अकोंडर्कोया, मुंबई. ( ९८१९३००७७५) | | सदस्य |
| २३. | श्रीमती अंजली पवार, पुणे . ( ९८२२२०६४८५ ) | | सदस्य |
| २४. | ॲड. अस्मिता पाटील, जळगांव. ( ९८६०७४९०००) | | सदस्य |
| २५. | श्रीमती आशा बाजपेयी, TISS ( ९८२०४४१२३०) | | सदस्य |
| २६. | श्रीमती रेखा बारहते, नागपूर. ( ९४२२१०११४७) | | सदस्य |
| २७. | असिम सरोदे, पुणे. ( ९८५०८२१११७) | | सदस्य |
| २८. | अलू छिब्बर, Spl. Children | | सदस्य |
| २९. | श्री. नानवान, उम्मीद Organisation . Mental Health ( ९८२०४७४२७५) | | सदस्य |
| ३०. | श्रीमती मंजिरी निमकर, प्रगती शिक्षण संस्था, फलटन, जि. सातारा . (manjunimbkar@gmail.com) | | सदस्य |
| ३१. | श्रीमती निगमा मस्कारिनस ( ९८२०४०१११२) | | सदस्य |
| ३२. | श्रीमती शैला म्हात्रे. ( ९८२१०२४८१७) | | सदस्य |
| ३३. | श्रीमती सुपर्णा गुप्ता, अंगण ट्रस्ट. ( ९८२१७२१७२३) | | सदस्य |
| ३४. | श्री. मधुकर गमले , ( ९४२२१९०८११) | | सदस्य |
| ३५. | श्री. अरुण खोरे, पुणे ( ९६०४००१८०० ) | | सदस्य |
| ३६. | श्री. सागर रेड्डी, पुणे ( ९०११२४१९३९ ) | | सदस्य |
| ३७. | श्री. सुनिलकुमार लवटे | | सदस्य |
| ३८. | श्रीमती संगिता लातूरकर , मुंबई ( ९८२०१४४१४१) sangeeta.laturkar४@gmail.com | | सदस्य |
| ३९. | ॲड. वर्षा रोकडे ( ९८२०३३७१८७) dr.varsharokade@gmail.com | | सदस्य |
| ४०. | श्री. राजीव चव्हाण. | | सदस्य |
| ४१. | श्री. पुरुषोत्तम चौधरी, चंद्रपूर . | | सदस्य |
| ४२. | श्रीमती सना सय्यद, Director, Help Mumbai Foundation ( ९८२०७९६६६१ ) | | सदस्य |
| ४३. | श्रीमती वरुणा खन्ना , Director, Help Mumbai Foundation ( ९८२१२२३३६५ ) | | सदस्य |
| ४४. | श्रीमती नगमा मोरारजी ( ९८२२०१०५५१ ) | | सदस्य |
| ४५. | श्रीमती सुजाता गनेजा . ( ९८२१७२७३४४ ) | | सदस्य |
| ४६. | श्री. प्रमोद निगुडकर ( ९८६०२८७९६६ ) | | सदस्य |
| ४७. | श्रीमती दिपा देशमुख, ( ९५४५५५५५४०) | | सदस्य |
| ४८. | श्रीमती विशाखा पटनम ( ९८२२७५४९२२) | | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४९. | श्रीमती अर्चना अष्टपुत्रे ( ९९२३८००९३७ ) | सदस्य |
| ५०. | अॅड. पुजा कुटे ( ९८२०९५७३६७) | सदस्य |
| ५१. | डॉ. शशिकांत वायदंडे, मानव विकास केंद्र | सदस्य |
| ५२. | अल्पा वोरा, युनिसेफ | सदस्य |
| ५३. | कामिनी कपाडिया, युनिसेफ | सदस्य |
| ५४. | डॉ. दिघे, राजमाता जिजाऊ मिशन | सदस्य |
| ५५. | डॉ. अरमिदा फर्नांडिस, स्नेहा, मुंबई | सदस्य |
| ५६. | निर्मला हिरेमठ, मोबाईल क्रेश पुणे | सदस्य |
| ५७. | अंजली देशपांडे | सदस्य |
| ५८. | फरिदा लांबे, प्रथम | सदस्य |
| ५९. | प्रविण महाजन, जनार्थ, औरंगाबाद | सदस्य |
| ६०. | प्रमोद निगुडकर | सदस्य |
| ६१. | निलिमा मेहता | सदस्य |
| ६२. | नीला डबीर | सदस्य |
| ६३. | उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| ६४. | सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग | सदस्य सचिव |

उपरोक्तपणे समितीने मसुदा अंतिम करुन शासनास दि.१५ ऑगस्ट, २०१३ पूर्वी सादर करावा.

३. त्यानंतर सदर मसुदा शासनाच्या वेबसाईटवर लोकांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात येईल व सर्व मंत्रालयीन विभागांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, त्यानंतर मसुदा मा. मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(म. बा. हजारी)
शासनाचे उप सचिव

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, महिला बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, महिला बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व संबंधित सदस्य / सदस्य
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
आयुक्त, महिला बाल विकास आयुक्तालय, पुणे
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
उप आयुक्त, महिला बाल विकास आयुक्तालय, पुणे
सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई
निवड नस्ती, का-०३

बाल विकास धोरण २०१३ चा मसुदा व प्राप्त झालेल्या सुधारणा यावर
चर्चा करणेबाबत कोअर समितीची स्थापना.

# आदेश

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग
३रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत
वरळी, मुंबई ४०००३०.
दिनांक १९ ऑगस्ट, २०१३

**संदर्भ : शासन निर्णय क्रमांक बाहआ-२०११/प्र.क्र.२५३/कार्या.३, दिनांक १३ मे, २०१३**

शासन निर्णय क्रमांक बाहआ—२०११/प्र.क्र.२५३/कार्या.३, दिनांक १३ मे, २०१३ अन्वये महाराष्ट्र राज्याकरीता नवीन बाल धोरण तयार करण्याकरीता मा. मंत्री महोदया, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे बाल धोरणाच्या प्रारुपाबाबत काही मुद्दांवर चर्चा करण्याकरीता खालीलप्रमाणे कोअर समितीची स्थापना करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मा. मंत्री, महिला व बालविकास | — | अध्यक्षा |
| २. मा. राज्यमंत्री, महिला व बालविकास | — | उपाअध्यक्षा |
| ३. मा. श्रीमती शोभाताई फडणवीस, आमदार | — | सदस्या |
| ४. मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार | — | सदस्या |
| ५. मा. श्रीमती विद्या चव्हाण, आमदार | — | सदस्या |
| ६. श्रीमती बिना लष्करी | — | सदस्या |
| ७. श्रीमती शैला म्हात्रे | — | सदस्या |
| ८. श्री. अरुण खोरे | — | सदस्य |
| ९. श्री. सुनिल लवटे | — | सदस्य |
| १०. श्री. राजीव चव्हाण | — | सदस्य |
| ११. श्री. प्रमोद निगुडकर | — | सदस्य |
| १२. श्रीमती कामिनी कपाडिया, युनिसेफ | — | सदस्या |
| १३. श्रीमती फरीदा लांबे | — | सदस्या |
| १४. श्रीमती निलीमा मेहता | — | सदस्या |
| १५. श्रीमती कमलाताई व्यवहारे | — | सदस्या |

sd/-
(स.श्री. सुपे)
अवर सचिव तथा प्रशासकीय अधिकारी

प्रत

**मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई**
**मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई**
**सर्व संबंधित सदस्या / सदस्य**

# बाल धोरण मसुद्यावरील क्रमवार कार्यवाही

१ बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ च्या कलम १३(१) अन्वये आयोगाला अस्तित्वात असलेल्या बाल धोरणाचे पुर्नविलोकन करुन व त्या आधारावर नवीन धोरण तयार करुन शासनाला शिफारशी करण्याचे अधिकार आहेत. त्याअन्वये आयोगाच्या दिनांक ६ एप्रिल, २०११ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र बाल धोरण २००२ चे पुर्नविलोकन करण्यास व नवीन धोरण मसुदा तयार करण्याचे निश्चित झाले.

२ बाल हक्क संरक्षण आयोगाने मसुदा धोरण तयार करण्याकरिता तज्ञ लोकांचा सल्ला घेण्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात दिली तसेच शासनाच्या वेबसाइटवरसुध्दा याबाबत प्रसिध्दी दिली.

३ लोकांकडून आलेल्या अभिप्रायांच्या आधारावर आयोगाने बाल धोरण मसुदा २०११ तयार करुन १, डिसेंबर २०११ रोजी शासनाकडे सादर केला.

४ शासनाने यशदा व युनीसेफ यांना सुध्दा बाल धोरण तयार करण्याबाबत निर्देश दिले होते त्यान्वये यशदा व युनीसेफ यांनी मसूदा बाल धोरण शासनाला सादर केला.

५ शासनाने दिनांक १३ मे, २०१३ च्या शासन आदेशान्वये बाल धोरण तयार करण्याकरीता मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे अध्यक्षतेखालील एका समितीची स्थापना केली.

६ सदर समितीची प्रथम बैठक दिनांक १३/६/२०१३ रोजी झाली. तीनही संस्थांनी तयार केलेल्या बाल धोरणाच्या मसुद्याचे वाचन झाले व सदस्यांच्या सहाय्याने त्या सर्व मसूद्यांतून विषय घेऊन त्या आधारावर बाल धोरण मसुदा तयार करण्यात आला व सदर मसुदा नागरिकांच्या अभिप्रायास्तव वेबसाईटवर; (आयोग, शासन व आयुक्तालय) ठेवण्यात आला. तसेच वर्तमानपत्रात जाहिराती देऊन लोकांकडून अभिप्राय मागवावे असे निश्चित झाले.

७ दिनांक २५/६/२०१३ रोजी पुनःश्च समितीची बैठक झाली व सदर बैठकीत आलेले सल्ले/अभिप्राय तसेच दिनांक १३/६/२०१३ रोजी चर्चेन्वये तयार बाल धोरण मसुदा चे परिच्छेद निहाय वाचन झाले. बैठकीदरम्यान उपस्थित सदस्यांनी बरेच अभिप्राय/सूचना दिल्या व असा निर्णय घेण्यात आला कि, हे सर्व अभिप्राय/सूचना पुनःश्च वेबसाईटवर ठेवून, लोकांकडून अभिप्राय मागविण्यात यावेत तसेच दिनांक १५/७/२०१३ रोजी पुन्हा बैठक आयोजित करावी.

८ दिनांक १५/७/२०१३ रोजी मुंबई येथील समितीची बैठक पुन्हा झाली बैठकीत पुन्हा आलेले सल्ले व लेखी अहवालावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की जास्तीत जास्त लोकांचा सहभाग घेण्याकरीता क्षेत्रीय स्तरावर बैठकी घेण्यात याव्यात त्यान्वये दिनांक २३/८/२०१३ रोजी नागपूर, दिनांक २७/८/२०१३ रोजी औरंगाबाद व दिनांक ५/९/२०१३ रोजी पुणे येथे सदर बैठकी आयोजित करण्यात आल्या. व लोकांचे अभिप्राय/सूचना घेण्यात आल्या.

९ समितीने घेतलेल्या निर्णयान्वये दिनांक २३/८/२०१३ रोजी नागपूर, दिनांक २७/८/२०१३ रोजी औरंगाबाद व दिनांक ५/९/२०१३ रोजी पुणे येथे क्षेत्रीय समितीच्या बैठकी आयोजित करण्यात आल्या व सर्व संबधित लोकांना बोलावून त्यांचे म्हणणे एकुण घेण्यात आले.

१० क्षेत्रीय स्तरावर झालेल्या चर्चेच्या आधारे व लोकांच्या अभिप्रायांच्या आधारावर मसुदा बाल धोरणात त्याप्रमाणे मुद्दे समाविष्ट करण्यात आले.

११ दिनांक २७/९/२०१३ च्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, सदर धोरण बालकांकरीता असल्याने बालकांचे म्हणणे सुध्दा ऐकून घेणे आवश्यक आहे व याकरीता मराठवाडा, विदर्भ, मुंबई व पुणे या विभागात बालकांचे म्हणणे घेण्याकरीता बालकांच्या गटांसह बैठक ठेवावी असे ठरले व या कामाकरीता मुंबई येथे डोअरस्टेप स्कूल व प्रथम या संस्थेला, मराठवाडा येथे सोशियो इकनॉमिक ट्रस्ट, विदर्भ येथे युनीसेफ, पुणे यथे श्री. अरुण खोरे व श्रीमती कमलताई व्यवहारे यांच्या संस्थेला सदर काम देण्यात आले. सदर बैठकीत असा निर्णय झाला की बाल धोरणाचा परिच्छेद निहाय वाचन बालकांच्या गटांपुढे करण्यात यावे व त्यावर बालकांचे अभिप्राय प्राप्त झाले तर ते अभिप्राय व त्यावरील अहवाल संबंधित समित्या दिनांक २१/८/२०१३ पर्यंत आयोगाकडे सादर करतील व असा सुध्दा निर्णय घेण्यात आला की बालधोरण मसूद्यावर इतर संबंधित विभागांचे मत घेण्याकरीता महिला व बाल विकास विभागातर्फे कार्यवाही करण्यात यावी जेणेकरुन १४ नोव्हेंबर च्या पूर्वी बालधोरण तयार होऊ शकेल. सदर बैठकीत असा सुध्दा निर्णय घेण्यात आला की, बालधोरणामध्ये व्याख्यांसंबंधी स्वतंत्र प्रकरण अंतर्भूत करावे.

१२ वर नमूद केल्याप्रमाणे संबंधितांनी बालकांच्या कार्यशाळा घेऊन त्यासंबंधीचे अहवाल आयोगाकडे सादर केलेले आहेत.

१३ या कार्यशाळेतील अहवालांवर दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ रोजी मा. मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये बाल धोरणाचा मसुदा अंतिम करण्यात आला.


मतीविना निती गेली
गती विना वित गेले
इतके अनर्थ एका

